पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३१८ ■ गुरूवार, दि.२८ मे २०२६ ■ मुल्य 5 रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283/ 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# श्री.गजानन नागरी सहकारी पतसंस्थेत 8 कोटी 97 लाखांचा अपहार

## नारायण, नंदकिशोर आवारे अटकेत ▶ गुंतवणूकदारांच्या २५ कोटींच्या ठेवी अडकल्या

प्रतिनिधी २८ मे

**अकोला :** श्री. गजानन नागरी सहकारी पतसंस्थेत ८ कोटी ९७ लाखांचा अपहार झाल्याचं समोर आलं आहे. पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून पिता-पुत्र दोघांना अटक करण्यात आली आहे. या पतसंस्थेत गुंतवणूकदारांच्या २५ कोटींच्या ठेवी अडकल्याची माहिती समोर आली आहे. यामुळं ठेवीदारांमध्ये संतापाचं वातावरण आहे.श्री. गजानन नागरी सहकारी पतसंस्थेतील अपहार प्रकरणी पिता-पुत्र असलेल्या अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर दोघांना अटक करण्यात आली आहे. या पतसंस्थेत ८ कोटी ९७ लाख रुपयांचा अपहार झाल्याचं समोर आलं आहे. तब्बल ८ कोटी ९७ लाख रुपयांच्या अपहार प्रकरणी पतसंस्थेचे अध्यक्ष नारायण आवारे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी असलेले त्यांचे पुत्र नंदकिशोर आवारे यांना पोलिसांनी अटक केली आहे.



यात्रकरणी अकोल्यातील डाबकी रोड पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून करण्यात आला आहे. गेल्या सहा महिन्यांपासून पतसंस्थेने ठेवीदारांना पैसे परत देणे बंद केले होते. त्यामुळे हजारो गुंतवणूकदारांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. अकोला शहरातील नोकरदार, पेन्शनर, कामगार आणि घरकाम करणाऱ्या महिलांसह सुमारे अडीच हजार ठेवीदारांचे पैसे या पतसंस्थेत अडकले आहेत. संस्थेत २५ कोटी रुपयांहून अधिक ठेवी असल्याची माहिती समोर आलीये. दरम्यान, संस्थेच्या अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अपहार करून हा पैसा इतरत्र गुंतवल्याचा आरोप गुंतवणूकदारांनी केला होता.

अकोल्यातील डाबकी रोड पोलिस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणामुळे सहकारी पतसंस्थांच्या कारभारावर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. ठेवीदारांनी आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.त्याच बरोबर सहकार विभागाच्या ढिसाळ कारभाराचे वाभाडे निघाले आहे.

### ठेवीदारांचे कोट्यावधींचे नुकसान

श्री. गजानन नागरी सहकारी पतसंस्थेत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याची तक्रार गेल्या काही महिन्यांपासून समोर येत होती. ठेवीदारांनी वारंवार पैसे परत मागूनही संस्थेकडून कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता. गेल्या ६ महिन्यांपासून ठेवीदारांना परतावा देणे बंद करण्यात आले होते. चौकशीत संस्थेतील कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाले. या पतसंस्थेत सुमारे अडीच हजार ठेवीदारांचे पैसे अडकले असल्याची माहिती समोर आली आहे. नोकरदार, पेन्शनर, कामगार तसेच घरकाम करणाऱ्या महिलांनी आयुष्यभराची बचत या संस्थेत ठेवली होती. संस्थेतील एकूण ठेवींची रक्कम २५ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे.

### अडकलेली रक्कम परत कधी मिळणार

पतसंस्थेच्या अकोल्यात २ तर तेल्हारा येथे १ शाखा कार्यरत असल्याची माहिती आहे. अडकलेली रक्कम परत कधी मिळणार याबाबत मोठी चिंता कायम आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा अधिक सखोल तपास सुरू असून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शहरातील इतर ही पतसंस्थांची तपासणी करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

### सोने तारण ठेवणाऱ्या संस्थांचे काय

शहरात अनेक संस्थांमध्ये बेटेंक्स किंवा बनावट सोन्याच्या आधारावर सोने तारण ठेवले जात आहे. या संस्थांमध्ये सोने गहाण ठेवताना पतसंस्थेच्या पॅनलवरचे मूल्यनिर्धारक अर्थात व्हॅल्युअर आणि संबंधित पतसंस्था, सहकारी बँकांच्या संचालकांचे असलेले हितसंबंध पाहता अनेक पतसंस्था व सहकारी बँका या दिवाळखोरीच्या वाटेवर असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ग्राहकांनी अशा पतसंस्था आणि सहकारी बँकांमध्ये गुंतविलेला पैसा त्वरीत काढून तो सुरक्षित व राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## नसरापूर प्रकरणात आता रोज 'इन कॅमेरा' सुनावणी

प्रतिनिधी २८ मे

**पुणे :** पुण्यातील भोर जिल्ह्यातील नसरापूर अत्याचार प्रकरणातील सगळ्यात मोठी बातमी समोर आली आहे. २८ दिवसात आरोपी विरोधात आरोप निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती आहे. नसरापूर अत्याचारआणि हत्या प्रकरणात आरोपीविरोधात आरोप निश्चित करण्यात आली आहे. न्यायालयाकडून आरोपीविरोधात प्राईमा फेसी पुरावे असल्याचे निरीक्षण न्यायालाकडून नोदवण्यात आले आहेत. आता खटल्याची रोज सुनावणी 'इन कॅमेरा' पद्धतीने होणार असल्याची माहिती समोर आली आहे.ष्नसरापूर अत्याचार प्रकरणातील आरोपीला पहिल्यांदाच प्रत्यक्ष कोर्टात हजर करण्यात आलं होतं. कोर्टात युक्तिवाद करताना आरोपीच्या वकिलांकडून विरोध करण्यात आला, मात्र पुरावे नसल्याने आरोपीवर आरोप निश्चिती करण्यात आली. पंधरा दिवसात चार्जशीट दाखल करण्यात आलं होतं. ते सादरही करण्यात आलं होतं.




## देशात कुठेच झाले नाही, असे कठोर उपोषण करणार!

प्रतिनिधी २८ मे

**जालना :** मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत, ३० मे पासून प्रखर उन्हात बेमुदत उपोषण करण्याची घोषणा केली आहे. देशात कुठेच झालं नाही, असं कठोर उपोषण करणार असल्याचे स्पष्ट करताना जरांगे-पाटील यांनी 'उष्माघातानं बळी गेल्यास त्याला सरकार जबाबदार असेल', असा इशारा दिला. उपोषणादरम्यान, मराठा समाजातील बांधवांनी अंतरवाली सराटीकडे येऊ नये,



असे आवाहन देखील जरांगे पाटील यांनी केले आहे. ते आज अंतरवाली सराटीत पत्रकार परिषदेत बोलत होते.

काही दिवसापूर्वी मनोज जरांगेंनी आमरण उपोषणाची घोषण केली होती. त्यानंतर, भाजपचे नेते प्रसाद लाड हे जरांगेंना भेटायला आले होते.

## अखेर सिद्धरमय्या यांनी सोडले मुख्यमंत्रीपद!

प्रतिनिधी २८ मे

**बंगळुरू :** कर्नाटकात मोठा उलटफेर झाला आहे. गेल्या काही दिवसापासून मुख्यमंत्री सिद्धरमय्या पदावरून पायउतार होणार असल्याची चर्चा होती. हायकमांडकडूनही तसा हिरवा कंदील मिळाला होता. सिद्धरमय्या यांना राज्यसभेची ऑफरही देण्यात आली होती. त्यानंतर अखेर आज सिद्धरमय्या यांनी मंत्रिमंडळाची ब्रेकफास्ट बैठक बोलावली. मंत्र्यांसोबत ब्रेकफास्ट करता करताच सिद्धरमय्या यांनी मुख्यमंत्रीपद सोडत असल्याची घोषणा केली. थोड्याच वेळात राज्यपालांना भेटून सिद्धरमय्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार आहेत.

सिद्धरमय्या यांच्यानंतर डीके शिवकुमार हे मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत.

सिद्धरामय्या यांनी सकाळी साडेदहा वाजता नाश्त्याच्या वेळी मंत्रिमंडळाची बैठक बोलावून घेतली.या बैठकीत आपल्या राजीनाम्याची घोषणा केली होती. त्यांच्या राजीनाम्यामुळे डी. के. शिवकुमार यांना मुख्यमंत्री बनण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, हे पद काही काळापासून मोठ्या चर्चेचा विषय बनले होते. कर्नाटकमध्ये २०२३ मध्ये काँग्रेसचे सरकार स्थापन झाले होते. २३ मे रोजी सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. डीके यांना उपमुख्यमंत्री करण्यात आले होते. त्यावेळी अडीच-अडीच वर्षांच्या फॉर्म्युल्यावर (सूत्रावर) चर्चा झाली होती. म्हणजेच पहिली अडीच वर्षे सिद्धरामय्या आणि उर्वरित अडीच वर्षे डीके शिवकुमार मुख्यमंत्री राहतील.

## मोटेगावकरच्या मुलाला प्रश्न पाठवले!

### नीट पेपरफूट प्रकरण : डॉ. शिरुरेच्या चौकशीत माहिती

प्रतिनिधी २८ मे

**पुणे :** 'नीट' पेपरफुटी प्रकरणी पुण्यातील भौतिकशास्त्राचा शिक्षक तेजस हर्षदकुमार शहा आणि लातूरचा डॉ. मनोज शिरूरे यांना दिल्लीच्या विशेष न्यायालयाने पाच दिवसांची 'सीबीआय' कोठडी सुनावली. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या १३ वर पोहोचल्याचे केंद्रीय अन्वेषण विभागाने स्पष्ट केले. अटकेत असलेल्या निवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याच्याकडून रसायनशास्त्राचे प्रश्न घेऊन ते लातूरमधील 'आरसीसी'चा संचालक शिवराज मोटेगावकर याच्या मुलासह तीन विद्यार्थ्यांना देण्यात डॉ. शिरूरेची भूमिका असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

तेजस शहा हा पुण्यातील 'डॉ. अभंग प्रभू मेडिकल अकादमी'त भौतिकशास्त्राचा शिक्षक आहे. त्याचं नाव अटकेत असलेली शिक्षिका मनीषा हवालदार हिच्या पतीच्या फोनमध्ये 'गॉड' या नावाने सेव्ह केला आहे. शहाने हवालदारकडून त्याने भौतिकशास्त्राचे प्रश्न मिळविले होते. चौकशीत ही बाब निष्पन्न झाली. 'सीबीआय'ने रसायनशास्त्राचा निवृत्त प्राध्यापक पी.व्ही. कुलकर्णी आणि लातूर येथील 'रेणुकाई करिअर सेंटर'चा (आरसीसी) संचालक शिवराज रघुनाथ मोटेगावकर यांना यापूर्वीच अटक केली आहे. त्यांना दिल्लीतील न्यायालयाने बुधवारी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. पेपरफुटी प्रकरणात कथित मुख्य सूत्रधार असलेला पी. व्ही. कुलकर्णी, बिबवेवाडी भागातील ब्युटी पार्लरचालक मनीषा वाघमारे, जीवशास्त्राची शिक्षिका मनीषा गुरुनाथ मांढरे, भौतिकशास्त्राची शिक्षिका मनीषा हवालदार आणि शिक्षक तेजस शहा यांना सीबीआयने अटक केली आहे.

## मविआ विधान परिषदेच्या १७ ही जागा लढविणार!

प्रतिनिधी २८ मे

**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधान परिषदेवर निवडून द्यायच्या १६ जागा व नागपूरच्या एका जागेवरील पोटनिवडणूक अशा सर्व १७ जागा महाविकास आघाडी लढवणार आहे. टिळक भवन येथे बुधवारी पार पडलेल्या महाविकास आघाडीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. दोन दिवसात पुन्हा एक बैठक घेऊन सर्वसंमतीने जागा वाटपाचा निर्णय जाहीर केला जाणार आहे.

बैठकीस काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, उद्धवसेनेचे नेते अनिल परब, अंबादास दानवे आणि मिलिंद नार्वेकर उपस्थित होते. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सपकाळ म्हणाले की, भाजप लोकशाही मानत नाही, त्यांनी निवडणुकीत घोडेबाजार मांडला आहे, 'पैसा फेक तमाशा देख'चा दुसरा अंक सुरू झाला आहे. ५ लाख रुपये आगाऊ देऊन नगरसेवकांची पळवापळवी केली जात आहे. अशा परिस्थितीत संविधानाच्या रक्षणासाठी मविआ एकजूटपणे विधान परिषदेची निवडणूक लढवणार आहे.



### पक्षाच्या ताकदीनुसार जागा

महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला अद्याप निश्चित झाला नसला तरी ज्या ठिकाणी ज्या पक्षाची ताकद आहे ती जागा तो पक्ष लढवेल, अशी शक्यता आहे. त्यानुसार वर्धा - चंद्रपूर - गडचिरोली, भंडारा - गोंदिया, उस्मानाबाद - लातूर, सांगली - सातारा या ठिकाणी काँग्रेसची ताकद आहे. परभणी - हिंगोलीमध्ये उद्धवसेनेची ताकद आहे. त्यानुसार जागावाटप होणार आहे. १७ जागांपैकी काँग्रेस सात ते आठ, तर उद्धवसेना पाच ते सहा जागा लढण्याची शक्यता आहे. त्याचवेळी शरद पवार गट तीन ते चार जागा लढेल, अशी चर्चा आहे. कोण कुठल्या जागांवर लढणार याविषयीचा निर्णय लवकरच होईल. त्यानंतर पक्ष उमेदवार निश्चित करेल.

### नाराजीचा होणार लाभ?

भाजप, शिंदेसेना आणि अजित पवार गटात जागा वाटपावरून अद्याप रस्सीखेच सुरू आहे. त्यामुळे महायुतीत सध्या नाराजी आहे. याच नाराजीचा फायदा उठविण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न आहे. त्यामुळे मविआकडून सर्व जागा लढवण्याचा निर्णय झाल्याचे सूत्रांनी सांगितले.


## नागपूरमध्ये 24 तासांत उष्माघाताचे 10 बळी?

नवतपाचा प्रकोप

प्रतिनिधी २८ मे

**नागपूर :** मे महिन्यात आधीपासून तापलेल्या सूर्याने नवतपा सुरू होताच उग्र रूप धारण केले आहे. बुधवारी कमाल तापमानात अंशतः वाढ नोंदविण्यात आली व नागपूरचा पारा ४५.७ अंशांवर पोहोचला. आकाशातून बरसणाऱ्या उष्ण ज्वाळांचा ताप असह्य होत असून, बुधवारी २४ तासांत नागपुरात उष्ण लाटांच्या प्रकोपाने १० लोकांचा बळी घेतला. यामध्ये रस्त्यावरील भिक्षेकऱ्यांसह तीन रेल्वे प्रवाशांचाही समावेश आहे.

विदर्भावर सूर्य आकाशातून आग




ओकत असल्याची स्थिती आहे. १३ पैकी ११ शहरांचे तापमान ४४ अंशांच्या वर आहे. नागपूरला ४५.७ अंश कमाल तापमान नोंदविण्यात आले. नागपूरच्या रेल्वे स्थानकावरच ५ लोकांचा मृत्यू नोंदविण्यात आला, ज्यात दोन भिक्षेकरी व तीन प्रवाशांचा समावेश आहे. प्रवाशांमध्ये चर्चापल्ली अमृत भारत एक्स्प्रेसच्या जनरल बोगीमध्ये प्रवास करीत असलेले मुसरिका रॉनामा (६०), चैन्नई सेंट्रल नई दिल्ली तामिलनाडू एक्स्प्रेसच्या जनरल बोगीतून प्रवास करणारे मेहरबान केवट (३४) आणि अहमदाबाद हावड़ा एक्स्प्रेसच्या एस-२ कोचमधून प्रवास करणाऱ्या एका व्यक्तीचा समावेश आहे. या तिन्ही व्यक्तींच्या मृत्यूसाठी इतर आजार कारणीभूत असल्याचे सांगण्यात येत असले तरी प्राथमिकदृष्ट्या उष्माघातानेच त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय आहे. याशिवाय प्लेटफॉर्म नंबर ३ वर निजामुद्दीन बंगळुरू राजधानी एक्स्प्रेसच्या गार्ड बोगीच्या समोर एक ४० वर्षीय अज्ञात व्यक्ती आणि प्लॅटफार्म नंबर १ वर एका ७० वर्षीय अज्ञात व्यक्तीचा समावेश आहे. दुसरीकडे नागपूर शहरातील विविध भागात उष्माघाताने पाच व्यक्तींचा मृत्यू झाला. सकाळी ११ वाजता सक्करदरा उड्डाणपुलाच्या खाली एक ५० वर्षीय व्यक्ती बेशुद्ध आढळून आली. रुग्णालयात डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. दुपारी १ वाजता ताजबाग लंगरखानाच्या भिंतीजवळ एक ५५ वर्षीय व्यक्ती मृतावस्थेत आढळला. याशिवाय ताजबाग कॉम्प्लेक्सच्या मागे एका ६० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. लकडगंज परिसरातील उड्डाणपुलाखाली एक ६५ वर्षीय व्यक्ती आणि कळमना फळ बाजारात एका ५० वर्षीय व्यक्तीचा मृतांमध्ये समावेश आहे.

### उष्णतेच्या लाटेचा वाजला सायरन

प्रशासनातर्फे बुधवारीसुद्धा शहरातील लाखो लोकांच्या मोबाइलवर उष्णतेच्या लाटेचा सायरन वाजला. या अलर्टवर आलेल्या सूचनेनुसार येत्या २४ तासात जिल्ह्यात काही ठिकाणी तीव्र उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता असून नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
गुरुवार, दि. २८ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अतोनात वृक्षतोड चिंताजनक...!



वृक्षतोड हा आजच्या काळातील एक अत्यंत गंभीर आणि चिंताजनक विषय आहे. मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी आणि कथित विकासासाठी मोठ्या प्रमाणावर जंगले नष्ट केली आहेत. याचे निसर्गावर आणि मानवी जीवनावर झालेले परिणाम अत्यंत भयानक आहेत.

वृक्षतोडीमुळे झालेले मुख्य परिणाम खालीलप्रमाणे सांगता येतील.

### हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ

कार्बन डायऑक्साइडचे वाढते प्रमाणः झाडे हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि आपल्याला ऑक्सिजन देतात. झाडेच नष्ट झाल्यामुळे हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण प्रचंड वाढले आहे.

### मान्सूनचे बदलते चक्र आणि दुष्काळ

अनियमित पाऊसः झाडे बाष्पीभवनाच्या प्रक्रियेत मदत करतात, ज्यामुळे ढग निर्माण होतात. वृक्षतोडीमुळे पावसाचे प्रमाण कमी झाले आहे आणि मान्सूनचे चक्र पूर्णपणे बिघडले आहे.

**दुष्काळ आणि पाण्याचे दुर्भिक्षः** वेळेवर पाऊस न पडल्यामुळे अनेक भागांत तीव्र दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते, ज्यामुळे भूजल पातळी खालावली आहे.

**वन्यजीवांचे आश्रयस्थान नष्टः** जंगले हे लाखो पशु-पक्षी आणि कीटकांचे नैसर्गिक घर आहे. वृक्षतोडीमुळे त्यांचे आश्रयस्थान नष्ट झाले असून अनेक दुर्मिळ प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.


**मानव-वन्यजीव संघर्षः** राहण्यासाठी जागा आणि खाण्यासाठी अन्न न मिळाल्यामुळे बिबट्या, वाघ किंवा हत्ती यांसारखे हिंस्र प्राणी मानवी वस्त्यांमध्ये घुसत आहेत, ज्यामुळे दोन्ही बाजूंचे नुकसान होत आहे.

**जमिनीची धूप आणि सुपीकता कमी होणे**

माती वाहून जाणेः झाडांची मुळे माती घट्ट धरून ठेवतात. झाडे नसल्यामुळे मुसळधार पावसात किंवा वाऱ्यामुळे जमिनीचा सुपीक थर वाहून जातो. जमीन नापीक होणेः जमिनीची धूप झाल्यामुळे शेतीची सुपीकता कमालीची घटते, ज्याचा थेट परिणाम अन्नधान्य उत्पादनावर होतो.

# अल निनोचे भारतावर होणारे परिणाम

'अल निनो' हा स्पॅनिश शब्द आहे. भौगोलिक आणि हवामानशास्त्राच्या भाषेत, प्रशांत महासागराच्या उष्णकटिबंधीय भागातील समुद्राच्या पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढण्याच्या स्थितीला 'अल निनो' असे म्हणतात. ही एक नैसर्गिक घटना असली, तरी याचा थेट परिणाम जागतिक हवामानावर, विशेषतः भारताच्या मान्सूनवर आणि शेतीवर होतो.



### अल निनो नेमके काय आहे?

सामान्य परिस्थितीत, पॅसिफिक महासागरात वाहणारे व्यापारी वारे पश्चिमेकडे वाहतात आणि गरम पाणी आशिया व ऑस्ट्रेलियाच्या दिशेने ढकलतात. मात्र, अल निनोच्या काळात हे व्यापारी वारे कमकुवत होतात. यामुळे गरम पाणी पूर्वेकडे म्हणजेच दक्षिण अमेरिकेच्या (पेरू देशाच्या) किनारपट्ट्यांकडे सरकते. समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान वाढल्यामुळे जगभरातील हवेच्या दाबाच्या पट्ट्यांमध्ये आणि वाऱ्यांच्या दिशेत मोठे बदल होतात.

### उपाययोजना आणि सज्जता

अल निनो ही एक नैसर्गिक आपत्ती असली, तरी आधुनिक तंत्रज्ञानामुळे याचा अंदाज आधीच लावणे शक्य झाले आहे. याचे परिणाम कमी करण्यासाठी खालील उपाययोजना आवश्यक आहेतः

### पाण्याचे काटेकोर नियोजनः

धरणांमधील पाण्याचा उपसा केवळ पिण्यासाठी आणि अत्यंत आवश्यक कामांसाठीच राखीव ठेवणे.

### हवामान पूरक शेती

शेतकऱ्यांनी कमी पाण्यात येणारी, दुष्काळ सहन करणारी आणि लवकर तयार होणारी पिके घेण्यावर भर दिला पाहिजे.

### भारतावर होणारे परिणाम

भारत हा प्रामुख्याने कृषीप्रधान देश असून देशाची अर्थव्यवस्था मान्सूनच्या पावसावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. अल निनोचा भारतीय हवामानावर खालीलप्रमाणे तीव्र परिणाम होतो.अल निनोच्या वर्षामध्ये भारतात मान्सूनचा पाऊस सरासरीपेक्षा कमी पडतो. यामुळे देशातील अनेक राज्यांमध्ये, विशेषतः महाराष्ट्र (मराठवाडा आणि विदर्भ), मध्य प्रदेश, आणि राजस्थान या भागांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. अल निनोमुळे उन्हाळ्याचा कडकडाट वाढतो. पावसाळ्यातही पावसाचे खंड पडल्यामुळे कमाल तापमानात मोठी वाढ होते आणि 'उष्णतेच्या लाटा' येण्याचे प्रमाण वाढते.

पाऊस कमी झाल्यामुळे नद्या, धरणे आणि भूगर्भातील पाणीपातळी खालावते. यामुळे पिण्याच्या पाण्याची आणि शेतीसाठीच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होते.

शेती आणि अर्थव्यवस्थेवरील परिणाम खरीप हंगामातील पिके जसे की सोयाबीन, कापूस, भात (तांदूळ) आणि मका यांच्या उत्पादनाला मान्सूनच्या लहरीपणाचा मोठा फटका बसतो. वेळेवर पाऊस न पडल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवते.

महागाईत वाढः शेतीचे उत्पादन घटल्यामुळे अन्नधान्य, भाजीपाला आणि डाळींचे भाव गगनाला भिडतात. बाजारात आवक कमी झाल्याने अन्नधान्याची महागाई वाढते.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला फटकाः शेतीचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडते, ज्यामुळे ग्रामीण भागातील क्रयशक्ती (खरेदी क्षमता) कमी होते. याचा थेट परिणाम देशाच्या एकूण जीडीपीवर होतो.

### जागतिक स्तरावरील परिणाम

अल निनोचा प्रभाव केवळ भारतापुरता मर्यादित नसून तो जागतिक आहेः

?ऑस्ट्रेलिया आणि इंडोनेशिया या देशांमध्ये भीषण दुष्काळ पडतो आणि जंगलांना वणवे लागण्याच्या घटना घडतात.

दक्षिण अमेरिका (पेरू आणि इक्वेडोर) येथे पाऊस कमी पडण्याऐवजी प्रचंड पूर येतो. तसेच समुद्राचे तापमान वाढल्याने माशांचे उत्पादन घटून तेथील मच्छीमार व्यवसायाला मोठा फटका बसतो.

### थेट मदत व विमाः

पीक विम्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक मदत मिळवून देणे आणि चारा छावण्यांची उभारणी करणे. अल निनो हा निसर्गाचा एक असा फेरा आहे जो मानवाच्या मर्यादित शक्तीची जाणीव करून देतो. बदलत्या हवामानामुळे अल निनोची तीव्रता आणि वारंवारता अधिक वाढत चालली आहे. त्यामुळे या संकटाचा सामना करण्यासाठी केवळ शासनानेच नव्हे, तर समाजानेही पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरणे आणि निसर्गाशी सुसंगत जीवनशैली अंगीकारणे हाच एक शाश्वत मार्ग आहे.

## दिन विशेष

# हिंदुत्व संकल्पनेचे प्रणेते विनायक दामोदर सावरकर



आज जयंती

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे २८ मे १८८३ रोजी झाला.ते भारतीय स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी, समाजसुधारक, मराठी कवी व लेखक होते. तसेच ते हिंदू तत्त्वज्ञ, आणि भाषाशुद्धी व लिपिशुद्धी ह्या चळवळींचे प्रणेते होते. १९३८ च्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. 'हिंदुत्व' या संकल्पनेचे प्रणेते असून सर्वसमावेशक हिंदुत्व मांडणारे होते. सावरकरांच्या मतानुसार हिंदुत्वाची व्याख्या - ''आसिंधु सिंधु पर्यन्ता, यस्य भारतभूमिका । पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः'' अशी आहे.

सावरकरांचे वडील दामोदरपंत सावरकरांच्या तीन मुलांपैकी ते दुसरे होते. वि.दा. सावरकरांना बाबाराव हे मोठे आणि नारायणराव सावरकर हे धाकटे भाऊ होते. सावरकरांची आई ते नऊ वर्षांचे असताना वारली. थोरल्या बंधूंच्या पत्नी येसूवहिनी यांनी त्यांचा सांभाळ केला.सावरकरांचे वडील १८९९च्या प्लेगला बळी पडले. सावरकरांचे प्राथमिक शिक्षण नाशिकच्या छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयामध्ये झाले. ते लहानपणापासूनच अत्यंत बुद्धिमान होते. त्यांनी वयाच्या तेराव्या वर्षी स्वदेशीचा फटका, स्वतंत्रतेचे स्तोत्र ह्या रचना केल्या. चाफेकर बंधूंना फाशी दिल्याचे वृत्त समजताच लहानग्या सावरकरांनी आपली कुलदेवता भगवती हिच्यापुढे 'देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी शपथ घेतली. ते मार्च, इ.स. १९०१ मध्ये यमुनाबाई यांच्याशी विवाहबद्ध झाले. लग्नानंतर इ.स. १९०२ साली फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला व इ.स. १९०६ साली उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले. राष्ट्रभक्तसमूह ही गुप्त संघटना सावरकरांनी पागे आणि म्हसकर ह्या आपल्या साथीदारांच्या साहाय्याने स्थापन केली. मित्रमेळा ही संघटना ह्या गुप्त संस्थेची प्रकट शाखा होती. ह्याच संघटनेचे पुढे अभिनव भारत ह्या संघटनेत रूपांतर झाले. इटालियन क्रांतिकारक आणि विचारवंत जोसेफ मॅझिनी ह्याच्या यंग इटली ह्या संस्थेच्या धर्तीवर हे नाव दिले गेले होते. सावरकरांनी पुण्यामध्ये १९०५ साली विदेशी कापडाची होळी केली. श्यामजी कृष्ण वर्मा ह्यांनी ठेवलेली शिवाजी शिष्यवृत्ती मिळवून कायद्याच्या अभ्यासासाठी सावरकर लंडनला गेले. ही शिष्यवृत्ती त्यांना देण्यात यावी अशी सुचवण स्वतः लोकमान्य टिळकांनी केली होती. लंडनमध्ये 'इंडिया हाउस' मध्ये अभिनव भारताचे क्रांतिपर्व सुरू झाले. मदनलाल धिंग्रा हा सावरकरांचा पहिला हुतात्मा शिष्य! मदनलालने कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याचा वध करून, हसत-हसत फाशी स्वीकारली. त्याच काळात त्यांनी इतर देशांमधील क्रांतिकारक गटांशी संपर्क करून त्यांच्याकडून बॉम्ब तयार करण्याचे तंत्रज्ञान आत्मसात केले. ते तंत्रज्ञान व २२ ब्राऊनिंग पिस्तुले त्यांनी भारतात पाठवली. त्यापैकीच एका पिस्तुलाने नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा वध अनंत कान्हेरे या १६ वर्षाच्या युवकाने केला. या प्रकरणात अनंत कान्हेरे, कृष्णाजी कर्वे व विनायक देशपांडे या अभिनव भारताच्या ३ सदस्यांना फाशी झाली.

१८५७ मध्ये इंग्रजांविरुद्ध भारतात झालेल्या उठावाचा साधार इतिहास सावरकरांनी लिहिला. हा उठाव म्हणजे केवळ एक बंड होय हा इंग्रज इतिहासकारांचा निष्कर्ष सावरकरांनी साधार खोडून काढला. राजद्रोहपर लिखाण प्रसिद्ध केल्याचा आरोप ठेवून सावरकरांचे थोरले बंधू बाबाराव सावरकर यांना ब्रिटिश शासनाने जन्मठेपेची शिक्षा देऊन काळ्या पाण्यावर धाडले. नाशिकच्या ह्या प्रकरणात वापरण्यात आलेली ब्राउनिंग जातीची पिस्तुले सावरकरांनी चतुर्भुज अमीन ह्याच्याकरवी धाडली होती. ब्रिटिश सरकारला याचा सुगावा लागताच त्यांनी सावरकरांना तात्काळ अटक केली. समुद्रमार्गाने त्यांना भारतात आणले जात असताना सावरकरांनी फ्रान्सच्या मॉर्सेलिस बेटाजवळ बोटीतून उडी मारली. ब्रिटिशांच्या कैदेतून सुटून त्यांनी पोहत फ्रान्सचा समुद्रकिनारा गाठला. पण किनाऱ्यावरील फ्रेंच रक्षकांना भाषेच्या समस्येमुळे सावरकरांचे म्हणणे कळले नाही, आणि ब्रिटिश सैनिकांनी त्यांना अटक करून भारतात आणले. त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यांना दोन जन्मठेपांची- काळ्या पाण्याची- शिक्षा (सुमारे ५० वर्षे अंदमानच्या तुरुंगात) ठोठावण्यात आली (इ.स. १९११). मॉर्सेलिस येथे उडी मारताना सावरकरांनी सखोल विचार केला होता. दोन देशांतील कैदी हस्तांतरण किंवा अन्य तत्सम करारांचा मुद्दा त्यांच्या मनात होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांना ब्रिटिश सरकारने अंदमानच्या काळकोठडीत ठेवले.

# राज्यातील मंदिर विश्वस्तांनी नोंदवला 'देवस्थान इनाम निर्मूलन प्रारुपाला' तीव्र विरोध !

मुंबई - महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियमाचा मसूदा त्वरित रहित करावा, या मागणीसाठी अष्टविनायक मंदिरे, विदर्भ देवस्थान समिती, विविध प्रमुख मंदिरांचे विश्वस्त, तसेच महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची २६ मे रोजी मंत्रालयात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमवेत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'मंदिर विश्वस्तांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करण्यात येईल', असे सांगितले. यासह राज्यातील मंदिरांच्या भूमीवरील अतिक्रमण हटवण्याचे आणि वरील प्रस्तावित कायद्याच्या मसूद्याविषयी हरकती व सूचना नोंदवण्याची ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्याचे आश्वासन मंत्र्यांनी दिले, अशी माहिती महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी दिली.



या बैठकीला स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजित सावरकर, हिंदू विधिज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे कार्याध्यक्ष बापू रावकर, श्री मयुरेश्वर (मोरगांव), श्री चिंतामणी (थेऊर), श्री सिद्धिविनायक (सिद्धटेक), श्री मोरया गोसावी संजीवन समाधी मंदिर आदीचे व्यवस्थापन पाहणारे 'चिंचवड देवस्थान ट्रस्ट'चे विश्वस्त केशव विद्वांस, पाली येथील श्री बल्लाळेश्वर देवस्थानचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे आणि उपाध्यक्ष वैभव आपटे, हिंदू जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे, विदर्भ देवस्थान समिती संस्थापक अध्यक्ष अनुप जैस्वाल, अमरावती येथील श्री पिंगळाई माता देवस्थानचे विनोद पाखोडे उपस्थित होते. प्रमुख पदाधिकाऱ्यांनी मंदिरांच्या भूमीवरील अतिक्रमणे, मंदिरांचे पुजारी, विश्वस्त यांच्या सविस्तर अडचणी महसूलमंत्र्यांपुढे मांडल्या. तसेच प्रस्तावित कायद्यातील गंभीर त्रुटी निदर्शनास आणून दिल्या.

'मंदिरांच्या इनामी भूमीची विक्री करण्याऐवजी मंदिरांच्या भूमीवरील अतिक्रमणे हटवण्याविषयी महाराष्ट्र सरकारने कार्यवाही करावी', अशी मागणी मंदिर विश्वस्तांनी केली. यावर सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. 'या अधिनियमाविषयी अधिकाधिक विश्वस्तांना सूचना आणि हरकती नोंदवता याव्यात, यासाठी विभागीय आयुक्तांसह तहसीलदार आणि जिल्हाधिकारी कार्यालय येथेही घेण्याची सूचना देऊ', असे आश्वासन महसूलमंत्र्यांनी दिले. महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियमाला समस्त मंदिर विश्वस्त आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचा ठाम विरोध आहे. सरकार हिंदुत्वनिष्ठ आहे. त्यामुळे सरकारने मंदिरांच्या हिताचा कायदा आणावा. जोपर्यंत मंदिरांच्या इनामी भूमी विक्रीसाठीच्या या प्रस्तावित कायद्याचा मसूदा रहित केला जात नाही, तोपर्यंत आमचा विरोध कायम राहिल. राज्यातील सर्व मंदिरांचे विश्वस्त, पुजारी, भाविक आणि समस्त नागरिक यांनी या अधिनियमाच्या विरोधात लवकरात लवकर सूचना आणि हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन सुनील घनवट यांनी या वेळी माध्यमांशी बोलतांना केले.

# सर्वोच्च न्यायालयाचे हार्दिक अभिनंदन, पण...!



भोपाळ येथील एका उच्चभ्रू व उच्चशिक्षित कुटुंबात ट्विशा शर्मा या कार्पोरेट व्यावसायिक व माजी अभिनेत्री असलेल्या विवाहितेचा हुंड्यासाठी छळ करून तिचा बळी घेतल्याचे प्रकरण सध्या गाजत आहे. सदर प्रकरणातील आरोपी हे उच्च शिक्षित असून वकील व न्यायाधीश आहेत. त्यांचा कायद्याच्या क्षेत्रात मोठा दबदबा असल्यामुळे सदर प्रकरणाचा तपास करण्यात पोलिसांनी हलगर्जी केली असून प्रकरण दाबण्याचा भरपूर प्रयत्न केल्याचे वृत्त आहे.

मात्र 'सत्यमेव जयते' असं म्हणतात ते अगदी बरोबर आहे. कारण ट्विशा शर्माचा हुंड्यासाठी सतत छळ केला जात होता, त्यातून तिने घरात फाशी घेऊन आत्महत्या केल्याचे बोलले जाते पण ही सासरच्या लोकांनी केलेली हत्याच असल्याचा दाट संशय आहे. या बहुचर्चित आणि अत्यंत संवेदनशील प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दाखल घेतली त्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे हार्दिक अभिनंदन. पण महिलेचा जीव गेल्यानंतर केल्या जाणाऱ्या कडक कार्यवाहीचा उपयोग काय? याउलट कोणत्याही स्त्रीवर कौटुंबिक हिंसाचार होणार नाही किंवा ती हुंडाबळी ठरणार नाही यासाठी संपूर्ण व्यवस्थेने संवेदनशील होऊन कायद्याची कडक अंमलबजावणी करावी यासाठी सर्वोच्च न्यायालय सकारात्मक पाऊल उचलणार काय? हा खरा महत्त्वाचा आणि गंभीर प्रश्न आहे. कारण अशा प्रकरणात स्त्रियांना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४, १५ आणि २१ अन्वये मिळालेल्या समानतेच्या आणि जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे रक्षण या मूलभूत हक्काचे उल्लंघन होत असते.

### हुंडाबळी : गंभीर सामाजिक समस्या :

भारतातील हुंडाबळी ही फार गंभीर व संवेदनशील सामाजिक समस्या झाली आहे. कारण देशात महिलांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार व हुंडाबळींचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालानुसार, देशात दररोज सरासरी १५ ते २० महिलांचा हुंड्यासाठी बळी जातो, ही बाब देशाच्या कायदा व सुव्यवस्थेला लाजिरवाणी असून सरकारसाठी अत्यंत शरमेची आहे. कुटुंबात सासरच्या लोकांकडून हुंड्याच्या अवास्तव मागण्या व त्यासाठी विवाहित स्त्रीचा होणारा शारीरिक व मानसिक छळ यामध्ये महिलांचा बळी जातो किंवा त्यांना टोकाचे पाऊल उचलण्यास भाग पाडले जाते. याचा अर्थ आम्ही कितीही आधुनिकतेच्या आणि शिक्षित उच्चशिक्षित होत असल्याच्या गप्पा करत असलो तरी काही सन्माननीय अपवाद वगळता आमच्या भारतीय समाजाची मानसिकता जुन्या रूढी, परंपरेने ग्रस्त असून अत्यंत हलकट प्रवृत्तीची आहे. आजही कुटुंबात स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. तर विवाहाच्या वेळी हुंडा मागणे हा प्रतिष्ठेचा व हुंडा न देणे हा सामाजिक अपमान मानला जातो. त्यामुळे हुंडा देण्या घेण्यावरून विवाहित स्त्रीला छळले जाण्याचे प्रकार सर्रास घडत असतात. पण तो कौटुंबिक प्रश्न आहे असे समजून पोलिस यंत्रणा अशी प्रकरणे गंभीरतेने घेत नाहीत तर दुसरीकडे समाज अशा घटनांमध्ये अलिप्ततेची भूमिका स्वीकारतो, ही सभ्य समाजाची संस्कृती म्हणावी काय?

### ट्विशा शर्मा प्रकरण :

भोपाळ येथील कटारा हिल्स भागात राहणाऱ्या उच्चभ्रू कुटुंबात १२ मे रोजी ३३ वर्षीय मॉडेल-अभिनेत्री आणि कार्पोरेट व्यावसायिक ट्विशा शर्मा या विवाहितेने फाशी घेऊन आत्महत्या केल्याचे प्रकरण उघडकीस आले. मात्र ट्विशाच्या आईवडिलांनी आपल्या मुलीला सतत हुंड्याची मागणी, मानसिक व शारीरिक छळ, सक्तीने गर्भपात यासारख्या गंभीर आरोपासह तिला ढकलून ठार मारल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी व्हावी यासाठी भोपाळ येथील एम्स मध्ये केलेल्या शवविच्छेदन अहवालावर आणि पोलिसांच्या तपासावर आक्षेप घेऊन त्यांनी भोपाळच्या कनिष्ठ न्यायालयात दुसऱ्या शवविच्छेदनाची मागणी केली होती. मात्र कनिष्ठ न्यायालयाने ती फेटाळल्यामुळे ट्विशा शर्माच्या माहेरच्या लोकांनी उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी करतांना, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अवनींद्र कुमार सिंह यांनी दिल्लीतील एम्स येथील एका विशेष पथकाला दुसरे शवविच्छेदन करण्याचे निर्देश दिले. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतल्यामुळे या प्रकरणात न्याय होईलही पण इतर प्रकरणाचे काय?

### कायद्याची कडक अंमलबजावणी व जलद निर्णयः

देशात वाढते कौटुंबिक हिंसाचार व हुंडा बळी ही समाजव्यवस्थेला लागलेली फार मोठी कीड असून त्यामुळे कुटुंब व्यवस्था उद्ध्वस्त होत आहेत. म्हणून आतातरी सर्वोच्च न्यायालयाने हुंडा बंदी कायदा, १९६१, भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ आणि कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ या महिलांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्यांची कडक अंमलबजावणी करण्यासाठी तातडीने पुढाकार घेणे गरजेचे आहे. याशिवाय कौटुंबिक हिंसाचार व हुंडाबळीची प्रकरणे स्वतंत्र व फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना तातडीने कठोर शिक्षा केली पाहिजे. तरच काही प्रमाणात का होईना आम्ही हुंडाबळीला पायबंद घालण्यास यशस्वी होऊ अन्यथा कायदे आहेत पण त्याची समाजात भीती नाही आणि कौटुंबिक हिंसाचारात निरपराध स्त्रिया मारल्या जातील हीच कायद्याच्या राज्यात समाजाची वास्तवता होत राहील हे निश्चित.

प्रा. डॉ.एम.आर.इंगळे
विभागीय सचिव डाटा अकोला

अलिकडील काळात काही बोटावर मोजण्या इतक्या घटनांमुळे महिला कायद्याचा गैरवापर करतात असा नरेटिव्ह हेतूतः चालविला जात आहे. पण माझा प्रश्न आहे की, गुन्हा सिद्ध न होता न्यायालय शिक्षा करते का? उलट शंभर गुन्हेगार सुटले तरी चालतील पण एका निरपराध व्यक्तीला शिक्षा होऊ नये हे न्यायालयाचे तत्त्व आहे. मग कायद्याचा दुरुपयोग होणार कसा?यासोबतच महिलांना संरक्षण देणारे कायदे आहेत मग पुरुषांना संरक्षण देणारे कायदे का नसावे जेणेकरून समानता पाळली जाईल असा एक वाद सुद्धा निर्माण केला जात आहे. यावरून स्त्रियांबाबत समाजाची मानसिकता कशी आहे हे दिसते. म्हणजे एकीकडे स्त्री ही जननी, आदिशक्ती आणि सृजनशील आहे असं म्हणायचं आणि दुसरीकडे तिने अन्याय सहन करत गुलामीतच जगायचं असाच समाजाचा समज आहे. त्यामुळे संविधानातील समानतेचा अर्थ आम्हाला कळलाच नाही असेच म्हणावे लागेल.

### समानता आणि महिला संरक्षण कायदे

भारतीय संविधानाला अभिप्रेत स्त्री-पुरुष समानता म्हणजे केवळ कायदेशीर समानता नव्हे, तर लिंगावर आधारित कोणताही भेदभाव न करता स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्क, संधी आणि सन्मान मिळवून देणे होय. म्हणून सामाजिक व ऐतिहासिक विषमतेने आणि रूढी परंपरेने शोषणग्रस्त, अन्यायग्रस्त व दुर्बल समजल्या गेलेल्या स्त्रियांच्या प्रगतीसाठी व सामाजिक समतेसाठी सरकारला विशेष कायदे बनवण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

या संवैधानिक तरतुदीनुसार स्त्रियांना समानतेची वागणूक व संरक्षण देण्यासाठी सरकारने हुंडा प्रतिबंध कायदा १९६१ मध्ये मंजूर करून हुंडा देणे, घेणे किंवा त्याची मागणी करणे हा गुन्हा आहे. दोषी आढळल्यास किमान ५ वर्षे कारावास आणि १५,००० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होते. भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ नुसार पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून महिलेचा छळ झाल्यास हा कायदा लागू होतो. यामध्ये ३ वर्षांपर्यंत कारावासाची व दंडाची तरतूद आहे. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ अन्वये शारीरिक, मानसिक, आर्थिक किंवा लैंगिक छळाला बळी पडलेल्या महिलांना कायदेशीर संरक्षण आणि निवारा मिळण्याची तरतूद आहे. म्हणजे कायदे आहेत पण त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अस्तित्वात असलेली यंत्रणा याबाबत फारशी गंभीर व संवेदनशील नाही म्हणूनच कौटुंबिक हिंसाचार व हुंडाबळींचे प्रमाण वाढत आहे, याची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेऊन कडक उपयोजना करणे आणि महिलांचे कौटुंबिक हिंसाचारात जाणारे बळी रोखण्यासाठी कायद्यात अधिक कडक तरतुदी करणे गरजेचे आहेच पण केवळ कायदे पुरेसे नाहीत, तर समाज आणि कुटुंबाच्या मानसिकतेत आमूलाग्र बदल होण्याची नितांत गरज आहे.

सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. २८ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# तळपत्या उन्हात महावितरण कंपनी मध्ये शेतकऱ्यांनी दिले धरणे

प्रतिनिधी २८ मे

**हिवरखेड :** महावितरण कंपनी मध्ये २७ मे च्या दुपारी तळपत्या उन्हामध्ये हिवरखेडसह गोर्धा, तळेगांव, अडगावं, चितलवाडी, खंडाळा, झरि, चिचारी, मोराडी, यासह आजुबाजूच्या खेड्यापाड्यातील शेकडो शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले. आमच्या शेतात होणारा वीज पुरवठा निदान ८ तास तरी द्या आमच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

अशी आपली व्यथा शेतकरी बांधवांनी वीज कंपनीत मांडली, आंदोलनातील शेतकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी अकोट महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी मिसाळ यांनी सुद्धा भेट दिली या आंदोलनात शेतकरी बांधवांची ही मागणी तात्पुरत्या स्वरूपात पूर्ण करण्याचे आश्वासन सबंधित अभियंत्यान कडून शेतकऱ्यांना मिळाले तात्पुरता दिलासा सुद्धा शेतकऱ्यांना मिळाला, परंतु सविस्तर तोडगा वरिष्ठांचा निर्णय झाल्यावरच निघेल अशी सुद्धा माहिती प्रसिद्ध पत्रकारांशी बोलतांना महावितरण कंपनी कडून देण्यात आली, शेतकऱ्यांच्या या ठिय्या आंदोलनात पोलिस बंदोबस्त सुद्धा होता.



- उन्हात हिवरखेडसह आजुबाजूच्या शेतशिवारात महावितरण पुरेसा वीजपुरवठा देत नसल्याने आमच्या पिकांची नासाडी होत आहे, हा प्रकार थांबवा याकरिता आम्ही शेकडो शेतकरी कडकडत्या उन्हात महावितरण ठिय्या देत होतो,
  **सुमीत ढबाले,**
  (मोराडी शिवार शेतकरी हिवरखेड)
- शेतकऱ्यांची अर्जाद्वारे मागणी आम्ही वरिष्ठांकडे पाठवली आहे, याबाबत आम्ही पाठपुरावा करून शेतकऱ्यांची समस्या सोडण्याचा प्रयत्न करू,
  **धांडे,** सहाय्यक अभियंता, हिवरखेड

# शहरात शांतता, ऐक्य व बंधुत्वाचा संदेश देत ईद-उल-अजहा उत्साहात साजरी



प्रतिनिधी २८ मे

**मुर्तीजापूर :** शहरातील स्टेशन परिसरात ईद-उल-अजहा (बकरी ईद) मोठ्या उत्साहात, शांततेच्या आणि बंधुत्वाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. मुस्लिम बांधवांनी नमाज अदा करून देशाच्या प्रगतीसह मानवजातीच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. शहरातील सामाजिक ऐक्य, परस्पर प्रेम आणि विश्वास कायम ठेवत सण उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी मुस्लिम समाजातील धर्मगुरूंनी समाजात शांतता व सौहार्द टिकविण्याचे आवाहन केले . शासनाच्या नियमांचे पालन करत सण साजरा करण्यावर भर देण्यात आला. तसेच महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या जनावरांची कुर्बानी न करण्याचा निर्धार मुस्लिम बांधवांनी व्यक्त केला.

नमाजानंतर ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजू वानखडे यांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देत शहरातील शांतता व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल आभार मानले. यावेळी मौलाना झाहेद आलम यांनी हजरत मोहम्मद पैगंबर आणि इब्राहिम अलैहिस्सलाम यांच्या जीवनातील त्याग, मानवता आणि कुर्बानीचे महत्त्व विषद केले. समाजात प्रेम, एकता आणि परस्पर सन्मान टिकवून ठेवणे हीच खरी ईद असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार अन्वर खान यांनी केले. यावेळी समाजसेवक शेख इमरान, सामाजिक कार्यकर्ते मन्सूर राही, शेख रफीक, मोहम्मद इमरान, मोहम्मद तंजीम, मोहम्मद शारिक, शेख हमीद, शेख जफर, शेख फारूक, जाकीर खान, सय्यद जुनेद, शेख रिजवान यांच्यासह मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# रस्त्यावरील धुळीने नागरिक हैराण.. अनोख्या आंदोलनाने वेधले लक्ष


प्रतिनिधी २८ मे

**अडगांव बु. :** एकिकडे देशात हायटेक रस्ते आणि 'डिजिटल इंडिया'च्या मोठमोठ्या गप्पा मारल्या जात आहेत. मात्र, दुसरीकडे रस्त्यावर धूळ उडु नये म्हणुन पाणी मारण्यासाठी चक्क जनतेलाच हातात झोळी घेऊन रस्त्यावर उतरुण भिकमांगो आंदोलन करावे लागत असल्याचे विदारक चित्र आज अडगांव बु येथे पाहायला मिळाले.

सध्या अकोट ते हिवरखेड रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्यासाठी संपूर्ण रस्ता उखडण्यात आला असून, या मार्गावरून धावणाऱ्या जड वाहनांमुळे दिवसभर धुळीचे प्रचंड लोट उसळत आहेत. या धुळीमुळे समोरील वाहन चालकाला समोरील रस्ता किंवा वाहन दिसत नसल्याने वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे प्रवासी, पादचारी आणि स्थानिक व्यापाऱ्यांना या धुळीमुळे श्वसनाचे, डोळ्याचे, आजार जडण्याची भीती निर्माण झाली आहे. जबाबदारीनुसार कंत्राटदाराने रस्त्यावर नियमित पाणी मारून धूळ शांत करणे बंधनकारक असताना, याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करत जनतेची समस्या सोडवण्यासाठी अखेर छत्रपती प्रतिष्ठानने पुढाकार घेत अध्यक्ष पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.२७ मे ला सकाळी अडगाव बु. बस स्टँडवर कार्यकर्त्यांनी स्वता पाण्याच्या टँकर करीता हातात झोळी घेऊन भीक मागण्यास सुरुवात केली. या आंदोलनाचे गांभीर्य ओळखुन रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या वाहधाऱकांनी आणि स्थानिक व्यापाऱ्यांनी स्वतःहून पुढे येत आंदोलनाच्या झोळीत सढळ हाताने मदत टाकली.आंदोलनाची दखल घेत कंत्राटदाराच्या संबंधित कर्मचाऱ्यांनी तात्काळ आंदोलन स्थळी धाव घेतली, तसेच रोडवर आता रोज नियमितपणे पाणी मारण्याचे आश्वासन देवून लगेच रस्त्यावर पाणी मारण्यास सुरुवात सुध्दा करण्यात आली.



# कत्तली साठी बांधून ठेवलेल्या दोन गोऱ्ह्यांना दिले जीवदान



प्रतिनिधी २८ मे

**हिवरखेड :** उमरशेवडी शेतशिवरात कत्तली साठी बाधून ठेवलेल्या दोन गुरांना दिले हिवरखेड पोलिसांनी जीवदान. एका झाडाखाली गुरे बांधून ठेवलेली दिसली. तसेच या मागील उद्देश पोलिसांच्या लक्षात आला. कोणीही जबाबदारी घेत नसल्याने पोलिसांनी गुरे ताब्यात घेतली. तसेच प्राणी संरक्षण कायद्यानुसार कारवाई केली.

# ब्लू मून आणि ग्रह तारकांची धामधूम !

प्रतिनिधी २८ मे

**अकोला :** यंदा नवनवे उच्चांक गाठणारा उष्णतेचा पारा काहिसा कमी होत असतांनाच उन्हाळा व पावसाळा यांना जोडणारा नवतपात दिवसा उन सावलीचा तर रात्री ग्रह तारकांचा लपंडावाचा खेळ आनंद देऊन जातो.अशातच आकाश मंडपात विविध खगोलीय घडामोडी अनुभवण्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन ङविश्वभारतीङ केंद्राद्वारे करण्यात येत आहे.

या मे महिन्यात १ मे व ३१ या दिवशी पौर्णिमा आल्याने ३१ मे च्या रात्री ब्लू मून असेल.यावेळी पृथ्वी चंद्र अंतर सुमारे २२ हजार कि.मी अधिक असल्याने चंद्र नेहमीपेक्षा ५.५ टक्के आकाराने लहान आणि १०.५ टक्के कमी प्रकाशमान दिसेल. चंद्र मात्र निळ्या रंगाचा दिसणार नाही. या वेळी सर्व दृश ग्रह दर्शनार्थ खुले असुन संध्याकाळी पश्चिम आकाशाची शोभा व्दिगुणित करणारे तेजस्वी शूक्र आणि सर्वात मोठा गुरु ग्रह एकमेकांच्या जवळ येतांना दिसत आहेत.या दोघांनाही बुध ग्रह मस्त पैकी सोबत देत आहे.याच वेळी पहाटे पूर्व आकाशात शनी आणि मंगळ दिसत असुन, १० जुनला शूक्र आणि गुरु या दोन महाग्रहांची युती बघता येईल. हा एक अनोखा क्षण असेल.याच कालावधीत दूर्बीणीतून शूक्र आणि बुध ग्रहांच्या संकष्टीच्या चंद्राप्रमाणे कला पाहता येतील.




दि. ३०मे आणि १ जूनला रात्री ८-०४ ते ८-०९ या वेळेत इंटरनॅशनल स्पेस स्टेशन क्रमाने उत्तर -पूर्व आणि पश्चिम ते दक्षिण आकाशात बघता येईल. सोबतच १ जून रोजी गुरु ग्रह कर्क राशीत, ३ जूनला चंद्र आणि नुन्की या धनु राशीतील ताऱ्याचे पिधान व ८ जूनला सूर्य मृग नक्षत्रात येऊन पावसाळा सुरु होईल.

# हिवरखेड येथे ईद उत्साहाने साजरी



प्रतिनिधी २८ मे

**हिवरखेड:** येथे ईद उल अज़ाची नमाज इदगाह येथे अदा करून मुस्मिल बांधवांनी ईद साजरी केली. मुस्लिम समाज बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. लहान मुले देखील त्यात होती.पोलिस बंदोबस्त तैनात होता.

# हातरूणला ईद उत्साहाने साजरी



प्रतिनिधी २८ मे

**हातरूण:** येथे ईद उल अझाची नमाज इदगाह येथे गुरूवारी सकाळी अदा करण्यात आली. येथे ईद अतिशय उत्साहाने साजरी करण्यात आली. गावात सकाळ पासून उत्साही वातावरण होते. नमाज झाल्या नंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. तसेच अन्य धर्मियांनी देखील शुभेच्छा दिल्या. अतिशय चांगले वातावरण गावात होते. तसेच पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# भाजयुमोतर्फे अकोटमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्साहात

प्रतिनिधी २८ मे

**अकोट :** भारतीय जनता युवा मोर्चा अकोट शहर मंडळाच्या वतीने गुरुवार, २८ मे रोजी 'कृती कार्यक्रम' अंतर्गत स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर जयंती कार्यक्रमाचे आयोजन जगदंबा अकॅडमी येथे करण्यात आले. कार्यक्रमाला युवक व विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जगदंबा अकॅडमीचे संचालक निलेश घोरे हे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून उमेश पवार उपस्थित होते. यावेळी भाजप शहराध्यक्ष हरीश टावरी, भाजयुमो जिल्हाध्यक्ष योगेश गोतमारे, जगन्नाथ बोडखे, पंकज कोलखेडे, भाजयुमो अकोट शहराध्यक्ष मयूर नाठे, अभिषेक देंडव, पीयूष ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात योगेश गोतमारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील देशाच्या विकास प्रवासाचा उल्लेख करत सावरकरांचे विचार युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. उमेश पवार यांनी सावरकरांचे चरित्र, त्यांचे साहित्यिक व राष्ट्रभक्त व्यक्तिमत्त्व तसेच हिंदुत्व, सामाजिक समता आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षीय भाषणात निलेश घोरे यांनी सावरकरांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसंदर्भात मार्गदर्शन केले. जगन्नाथ बोडखे यांनी हिंदुत्व हे समाजाला जोडणारे विचारधन असल्याचे सांगत युवकांनी वाईट प्रवृत्तींचा प्रतिकार करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर नाठे यांनी केले, तर आभार प्रदर्शन हरीश टावरी यांनी मानले.



# श्री बाराभाई गणेशोत्सव मंडळा कडून गार्गी निनोरेचा गौरव



प्रतिनिधी २८ मे

**अकोला :** राजराजेश्वर नगरीतील प्रथम क्रमांकाच्या मानाच्या श्री बाराभाई गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सॉफ्टबॉल राष्ट्रीय स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करणारी गार्गी निलेश निनोरे हिचा सत्कार करण्यात आला. गार्गी निलेश निनोरे, इयत्ता ७ वी, होलीक्रॉस कॉन्व्हेंटची विद्यार्थिनी असून, दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या नॅशनल स्कूल गेम्स सॉफ्टबॉल स्पर्धेत तिने उत्कृष्ट कामगिरी करत रोप्य पदक प्राप्त करून शाळा, कुटुंब तसेच परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. तिच्या या यशाबद्दल श्री बाराभाई गणेशोत्सव मंडळाच्या वतीने तिचा गौरव करण्यात आला. यावेळी श्री कैलास इंगळे, विलास निनोरे, राहुल इंगळे, स्वप्नील पाठक, निलेश निनोरे, गौरव शर्मा, सौ. वृंदाताई निनोरे तसेच सौ. वैशाली निनोरे यांच्या हस्ते गार्गी हिला सन्मानचिन्ह प्रदान करून तिचे अभिनंदन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी तिच्या यशाचे कौतुक करत भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत अकोला क्रीडा प्रबोधिनीला 7 सुवर्ण, 2 कांस्य पदके

## यू-२३ जकार्ता आशियाई बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेकरिता भारतीय संघ निवड चाचणीसाठी ७ खेळाडूंची निवड

प्रतिनिधी २८ मे

**अकोला :** यू-२३ पुरुष व महिला वरिष्ठ राज्यस्तरीय आंतर-विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत अकोला क्रीडा प्रबोधिनीच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन करत संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. दमदार पंच, आक्रमक खेळ आणि उत्कृष्ट तांत्रिक कौशल्याच्या जोरावर प्रबोधिनीच्या खेळाडूंनी तब्बल ७ सुवर्ण पदके आणि २ कांस्य पदके पटकावत अकोल्याचा झेंडा राज्यभर फडकवला. या नेत्रदीपक कामगिरीमुळे अकोला क्रीडा प्रबोधिनीच्या तब्बल ७ खेळाडूंना यू-२३ एशियन बॉक्सिंग चॅम्पियनशिप, जकार्ता (इंडोनेशिया) स्पर्धेसाठी होणाऱ्या भारतीय संघाच्या निवड चाचणीमध्ये स्थान मिळाले आहे.भारतीय संघाची निवड चाचणी स्पर्धा ही पटियाला ऱ्एऱ्घ्ए या ठिकाणी दि २८ मे ते १ जून दरम्यान होणार आहे.

नागपूर येथे झालेल्या आंतर-विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत महिला गटात पदक प्राप्त खेळाडू स्वप्ना चव्हाण : ५७ ते ६० किलो, पलक झांबरे :-६० ते ६५ किलो, गौरी मुरूमकार :-७५ ते ८० किलो व पूर्वा गावंडे : ७५ ते ८० किलो सुवर्ण पदक प्राप्त केले. तसेच गायत्री माटे :-६५-७० किलो मध्ये कांस्य पदक प्राप्त केले. त्याप्रमाणे पुरुष गटातील वैभव जरवाल:-५५ ते ६० किलो, हर्ष सनवाल:-८० ते ८५ किलो, आणि नीलकंट पुजारी : ९०इ किलो सुवर्ण पदक प्राप्त केले. त्याबरोबर प्रज्वल डोंगरे ६५-७० किलो मध्ये कांस्य पदक प्राप्त केले. या सर्व यशामागे ङअकोला क्रीडा प्रबोधिनीचे आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग प्रशिक्षक मा. सतीशचंद्र भट्ट यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि कठोर परिश्रम असल्याची भावना खेळाडूंनी व्यक्त केली.ङ भट्ट सर यांच्या शिस्तबद्ध प्रशिक्षण पद्धतीमुळे आणि खेळाडूंमध्ये जिद्द निर्माण करण्याच्या क्षमतेमुळे प्रबोधिनीने राज्यस्तरावर पुन्हा एकदा आपला दबदबा सिद्ध केला आहे. खेळाडूंच्या या अभूतपूर्व यशामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आता सर्वांचे लक्ष जकार्ता येथे होणाऱ्या निवड चाचणीकडे लागले असून अकोल्याचे हे युवा भारतीय संघात स्थान मिळवून आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे. ङया सर्व खेळाडूंना मा. जिल्हाधिकारी वर्षा मीना, मा.उपसंचालक श्री शेखर पाटील,आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग प्रशिक्षक मा. सतीशचंद्र भट्ट,बॉक्सिंग प्रशिक्षक गजानन कबीर, योगेश निषाद, आदित्य मने आणि सय्यद साद, यांनी शुभेच्छा दिल्या.





सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २८ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# ब्लॉकस्तरावर सर्वसमावेशक संघटन उभारणार : काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन नाईक

## 'दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट' ला सदिच्छा भेट

प्रतिनिधी २८ मे

राहुल वासनिक

**यवतमाळ :** अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या 'संघटन सृजन अभियान' अंतर्गत झालेल्या प्रक्रियेनंतर सचिन नाईक यांची यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामीण भागातून राजकीय प्रवास सुरू केलेल्या नाईक यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यावर भर देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

'दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट' कार्यालयाला दिलेल्या सदिच्छा भेटीत नाईक यांनी जिल्ह्यात तळागाळापर्यंत संघटन विस्ताराची रूपरेषा मांडली. यावेळी संवाद साधतांना नाईक ते म्हणाले की, प्रत्येक ब्लॉकमध्ये युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, सेवा दल, एनएसयूआय तसेच एससी, एसटी, ओबीसी, व्हीजेएनटी, अल्पसंख्याक आणि सोशल मीडिया अशा सर्व घटकांचे स्वतंत्र ११अध्यक्ष नेमून सर्वसमावेशक संघटन उभारले जाणार आहे.




युवकांना संविधानाधारित राजकारणाचे प्रशिक्षण देण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार असून, सुमारे एक हजार तरुणांना प्रशिक्षण देण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

तसेच 'एसआयआर जनजागृती अभियान' राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, केंद्र व राज्य सरकारवर टीका करताना नाईक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जनहिताऐवजी वैयक्तिक अजेंडा राबवत असल्याचा आरोप केला. पेट्रोल-डिझेलसह जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त असल्याचे त्यांनी नमूद केले. यवतमाळ नगरपरिषदेच्या अतिक्रमणविरोधी कारवाईवरही त्यांनी प्रश्न उपस्थित करत, फेरीवाल्यांसाठी पथविक्रेता कायद्याअंतर्गत पर्यायी व्यवस्था न करता केलेली कारवाई अन्यायकारक असल्याचे मत व्यक्त केले.जिल्ह्यात उद्योगवाढीसंदर्भात अपेक्षित प्रयत्न झाले नसल्याचा आरोप करत, उद्योगमंत्री इंद्रनील नाईक यांच्या भूमिकेवरही त्यांनी सवाल उपस्थित केला. यावेळी सिटी न्यूज सुपरफास्टचे ब्युरोचिफ राहुल वासनिक यांनी जिल्हा काँग्रेसचे नवनियुक्त अध्यक्ष सचिन नाईक यांचे स्वागत केले. याप्रसंगी काँग्रेसचे पदाधिकारी संजय ठाकरे उपस्थित होते.

# पुसद शहरात ईद-उल-अजहाची नमाज

प्रतिनिधी २८ मे



**पुसद :** ईद-उल-अजहा (बकरी ईद) निमित्त गुरुवारी (दि. २८) पुसद शहरातील ईदगाह तसेच विविध मशिदींमध्ये मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात ईदची नमाज अदा केली. सकाळपासूनच शहरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

नवीन वस्त्र परिधान करून मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने ईदगाह आणि मशिदींमध्ये दाखल झाले. नमाजपूर्वी उलेमांनी ईद-उल-अजहाच्या धार्मिक महत्त्वाविषयी मार्गदर्शन करत बंधुभाव, शांतता आणि मानवतेचा संदेश दिला.

नमाजनंतर नागरिकांनी एकमेकांची भेट घेत "ईद मुबारक"च्या शुभेच्छांची देवाणघेवाण केली. शहरातील विविध भागांत आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

दरम्यान, ईदगाह व प्रमुख मशिदी परिसरात शांतता आणि सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी दक्षता घेतली.

# पाथ्रड गोळे येथील कामांची पाहणी

प्रतिनिधी २८ मे

**नेर :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात पाथ्रड गोळे ग्रामपंचायतीने तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. आता या ग्रामपंचायतची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय मूल्यमापन समितीने गावाला भेट देऊन पाहणी केली. मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांच्या अध्यक्षतेत समितीने गावातील स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्था, आरोग्य सुविधा, शिक्षण, पर्यावरण संवर्धन तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन केले. यावेळी प्रकल्प संचालक राहुल काळभोर, तसेच जिल्हा व्यवस्थापक आकाश चापले, सरपंच नीलिमा रोशन चोपडे उपस्थित होते.

# चार दुचाकी चोरीचा उलगडा; आरोपी जेरबंद

प्रतिनिधी २८ मे

**यवतमाळ :** शहरातील दुचाकी चोरी प्रकरणाचा यवतमाळ शहर पोलिसांनी काही तासांत उलगडा करत एका आरोपीला अटक केली. आरोपीकडून चोरीच्या चार दुचाकी जप्त करण्यात आल्या असून त्यांची किंमत सुमारे १ लाख २५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याबाबत संजय श्रीधर ठवळे (रा. चांदोरे नगर, यवतमाळ) यांनी २७ मे रोजी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांची एमएच-२७-एस-८३८१ क्रमांकाची हिरो होंडा स्प्लेंडर ही दुचाकी विश्वशांती नगर, पिंपळगाव बायपास परिसरातून चोरीस गेली होती. याप्रकरणी बीएनएस कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.



तपासादरम्यान डीबी पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पारस अपार्टमेंट परिसरातील पडीत इमारतीत सापळा रचण्यात आला. यावेळी मनोज भास्कर देमनगुंडे (वय ४१, रा. पिंपळगाव, यवतमाळ) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून चोरीची हिरो होंडा स्प्लेंडरसह टीव्हीएस ॲक्टिव्हा, फॅशन प्रो आणि टीव्हीएस एनटॉर्क अशा चार दुचाकी जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या नेतृत्वात डीबी पथकाने केली.

# राळेगावात तहसीलदार ॲक्शन मोडवर; रेती तस्करांविरोधात धडक मोहीम

प्रतिनिधी २८ मे

**राळेगाव :** वर्धा नदीच्या पात्रामुळे राळेगाव तालुक्यात रेती घाटांची संख्या मोठी असून, सध्या रोहिणी आणि हिरापूर येथील घाट सुरू आहेत. शासनाने रेती उत्खननासाठी सूर्योदय ते सूर्यास्त या वेळेतच काम करण्याचे नियम घालून दिले असतानाही काही ठिकाणी रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात अवैध रेती उपसा सुरू असल्याचे चित्र आहे. तसेच एकाच रॉयल्टीवर अनेक फेऱ्या मारल्या जात असल्याने शासनाच्या महसुलालाही फटका बसत असल्याची चर्चा आहे.

> ■ या पार्श्वभूमीवर राळेगावचे तहसीलदार अमित भोईटे यांनी अवैध रेती तस्करीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. मागील चार ते पाच दिवसांपासून त्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी सुरू केली आहे. ट्रक व ट्रॅक्टरची तपासणी करून नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई केली जात असल्याने रेती तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

मागील वीस ते पंचवीस दिवसांत अवैध रेती वाहतूक करणाऱ्या अनेक वाहनांवर महसूल प्रशासनाने कारवाई केली आहे.

तहसीलदार भोईटे हे स्वतः पथकासह रात्री उशिरापर्यंत पेट्रोलिंग करत असल्याने तालुक्यातील अवैध रेती व्यवसायात मोठी खळबळ उडाली आहे.

दरम्यान, अवैध रेती उत्खनन रोखण्यासाठी महसूल प्रशासनाने सुरू केलेल्या या धडक कारवाईचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे.

# नव्या रेल्वे मार्गासाठी आर्णीकर सरसावले

## कृती समितीची स्थापना; किशोर रावते यांच्याकडे नेतृत्व

प्रतिनिधी २८ मे

**आर्णी :** यवतमाळ–आर्णी–माहूर–किनवट–आदिलाबाद हा नवा रेल्वे मार्ग सुरू करण्यात यावा, या मागणीसाठी आर्णीतील नागरिक एकवटले असून बुधवारी झालेल्या प्राथमिक बैठकीत रेल्वे कृती समितीची स्थापना करण्यात आली. समितीच्या प्रमुखपदी सेवानिवृत्त तालुका गट शिक्षण अधिकारी किशोर रावते यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



या कृती समितीत गणेश हिरोळे, अजय छल्लानी, प्रमोद कुदळे, जाफर शेख, सचिन येलगंधेवार, रवी जाधव, अभिलाष इंगोले, गजानन बुटले, तुळशीराम मोरकर, प्रविण मुनगीणवार, सादिक शेख, प्रियाताई तोडसाम, किशोर उपलेंचवार, श्रीराम राऊत, सुरेश पवार, दत्तात्रय भोयर, कपिल ठाकरे आदींचा समावेश करण्यात आला आहे.

तसेच शहरातील सर्व पत्रकारांची स्वतंत्र प्रसिद्धी समिती गठीत करण्यात आली आहे.

बैठकीत रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी व्यापक जनजागृती अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. शहर व तालुक्यातील नागरिकांना या रेल्वे मार्गाचे फायदे पटवून देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. यासोबतच विद्यमान व माजी लोकप्रतिनिधींना भेटून मागणीचे निवेदन देण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

लवकरच मार्गदर्शक समितीचीही स्थापना करण्यात येणार असून रेल्वे मार्गाच्या मागणीची चळवळ अधिक वेगाने पुढे नेण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, आर्णी–आदिलाबाद रेल्वे मार्गासाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र देऊन मागणी मांडल्याबद्दल खासदार प्रतिभा धानोरकर यांचे बैठकीत आभार मानण्यात आले.

# जिल्हाधिकारी ऑनफिल्ड; पेट्रोल पंपांची पाहणी

## शेतकऱ्यांना प्राधान्याने डिझेल देण्याच्या सूचना

प्रतिनिधी २८ मे

**यवतमाळ :** जिल्हाधिकारी विकास मीना यांनी बुधवारी शहरातील विविध पेट्रोल पंपांना प्रत्यक्ष भेट देत इंधन साठा व वितरण व्यवस्थेची ऑनफिल्ड पाहणी केली. दर्डा नगर येथील जैस्वाल पेट्रोल पंप तसेच पांढरकवडा रोडवरील धनगंगा पेट्रोल पंप येथे त्यांनी तपासणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

पाहणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी नोंदवही, इंधन पुरवठ्याची माहिती, आवश्यक कागदपत्रे तसेच सीसीटीव्ही यंत्रणेची तपासणी केली. इंधन वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखावी आणि नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी खबरदारी घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.



शेतकऱ्यांना प्राधान्याने डिझेल उपलब्ध करून द्यावे, पेट्रोल पंपांवरील गर्दी टाळण्यासाठी योग्य नियोजन करावे, सीसीटीव्ही डेटा सुरक्षित ठेवावा तसेच इंधन साठ्याची माहिती दर्शनी भागात स्पष्टपणे प्रदर्शित करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पेट्रोल पंप चालकांना दिल्या.

या पाहणीवेळी जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच संबंधित पेट्रोल पंप चालक उपस्थित होते.

# महा-ई-सेवा केंद्र व 'आपले सरकार' पोर्टलचे सर्व्हर डाऊन

## प्रमाणपत्रांसाठी रांगा; प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होण्याची भीती

प्रतिनिधी २८ मे

**उमरखेड :** शाळा व महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रियेचा कालावधी सुरू असताना महा-ई-सेवा केंद्र आणि 'आपले सरकार' पोर्टलच्या संथ गतीमुळे उमरखेड तालुक्यातील विद्यार्थी व पालक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. विविध प्रमाणपत्रांसाठी अर्ज करताना वारंवार सर्व्हर डाऊन होणे, पोर्टल लॉक होणे आणि अर्ज अपलोड न होण्याच्या समस्यांमुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र आदी कागदपत्रांची आवश्यकता असते. मात्र गेल्या काही दिवसांपासून 'आपले सरकार' पोर्टल अत्यंत संथ गतीने कार्यरत असल्याने अर्ज प्रक्रिया रखडली आहे. अनेक वेळा अर्ज भरल्यानंतर पावती मिळत नसल्याने विद्यार्थ्यांना पुन्हा प्रक्रिया करावी लागत असल्याचे चित्र आहे.

महा-ई-सेवा केंद्र चालकांनी सांगितले की, दिवसाला मोठ्या प्रमाणात अर्ज येत असले तरी पोर्टल दर दहा ते पंधरा मिनिटांनी बंद पडत आहे. एका अर्जासाठी तब्बल अर्धा तास लागत असल्याने केंद्रांवर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे वेळापत्रक विस्कळीत होत असून पालकांनाही वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत.

दरम्यान, प्रवेशाची अंतिम मुदत जवळ येत असताना आवश्यक प्रमाणपत्रे वेळेत मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. ग्रामीण भागात नेटवर्क आणि सर्व्हरच्या समस्येमुळे ऑनलाईन प्रक्रियेचा उद्देशच फोल ठरत असल्याची नाराजीही व्यक्त होत आहे.

या संदर्भात तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांनी, "पोर्टलची गती वाढविण्यासाठी वरिष्ठ स्तरावर माहिती देण्यात आली असून तांत्रिक अडचणी दूर होताच प्रलंबित अर्ज निकाली काढण्यात येतील," असे सांगितले.

दरम्यान, पोर्टलची समस्या पूर्णपणे सुटेपर्यंत ऑफलाईन पर्याय उपलब्ध करून द्यावा किंवा प्रवेश प्रक्रियेला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी विद्यार्थी व पालकांकडून होत आहे.

तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर परिणाम होऊ नये म्हणून प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी उमरखेड तालुक्यात जोर धरत आहे.

# बोरी (चातारी) रेतीघाटावर 'अलिखित लिलाव'

## तस्करांकडून पैनगंगा पात्राची खुलेआम लूट; तलाठी व अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशय

प्रतिनिधी २८ मे

**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील विदर्भ-मराठवाडा सीमेलगत वाहणाऱ्या पैनगंगा नदीपात्रातील बोरी (चातारी) येथील लिलाव न झालेला रेतीघाट सध्या अवैध रेती उत्खननाचा अड्डा बनल्याची गंभीर चर्चा सुरू आहे. स्थानिक तलाठी व महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून मराठवाड्यातील रेती तस्करांकडून दिवस-रात्र हजारो ब्रास रेतीचा उपसा सुरू असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे.

शासनाच्या गौण खनिज संपत्तीची उघडपणे लूट सुरू असतानाही महसूल प्रशासन मात्र 'ब्र' काढत नसल्याने संशय अधिक गडद झाला आहे. बोरी (चातारी) रेतीघाटाचा अधिकृत लिलाव झालेला नसतानाही येथे मोठ्या प्रमाणात रेती उत्खनन होत असून शासनाच्या महसुलाला लाखो रुपयांचा फटका बसत असल्याचे बोलले जात आहे. स्थानिकांकडून वारंवार तक्रारी करण्यात आल्या, मात्र संबंधित तलाठी व रेती तस्करांचे 'मधुर संबंध' असल्याने कोणतीही प्रभावी कारवाई होत नसल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, महसूल विभागाचे वाहन रेतीघाटाच्या दिशेने येत असल्याची माहिती आधीच तस्करांना दिली जात असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. त्यामुळे छापेमारीपूर्वीच तस्कर पसार होत असल्याचे सांगितले जाते.

तालुक्यातील काही रेतीघाटांचे लिलाव झाल्यामुळे "माझी लाखोंची कमाई बुडाली," अशी चर्चा संबंधित तलाठी खासगीत करत असल्याचाही दावा स्थानिकांकडून केला जात आहे. त्यामुळे वैयक्तिक फायद्यासाठीच बोरी (चातारी) रेतीघाटावरील अवैध उत्खननाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याची चर्चा रंगली आहे.



### रेती तस्करांना आधीच मिळते 'सूचना'?

> ■ बोरी (चातारी) रेतीघाटावर महसूल विभागाची कारवाई होण्यापूर्वीच तस्करांना माहिती दिली जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे महसूल पथक पोहोचेपर्यंत रेती माफिया वाहनांसह पसार होत असल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, पैनगंगा नदीपात्रातील बेसुमार उत्खननामुळे पर्यावरणीय संकटही गडद होत आहे. जेसीबीच्या साह्याने नदीपात्रात मोठमोठे खड्डे करण्यात आल्याने पाण्याचा नैसर्गिक प्रवाह विस्कळीत झाला आहे. जंगल भागातील अनेक गावे व वन्यजीव पाण्यासाठी भटकंती करत असून, उमरखेड तालुक्याचे निसर्गवैभव मानला जाणारा सहस्त्रकुंड धबधबाही कोरडा पडल्याची खंत व्यक्त होत आहे.

### अवैध उत्खननामुळे पैनगंगा कोरडी

> ■ पैनगंगा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात जेसीबीने उत्खनन केल्याने पाण्याचा प्रवाह खंडित झाला आहे. जंगल भागातील गावांमध्ये पाणीटंचाई तीव्र झाली असून पशुपक्ष्यांनाही फटका बसत आहे. सहस्त्रकुंड परिसरातील जलसाठाही कमी झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

अवैध रेती उत्खननामुळे कृत्रिम पाणीटंचाई निर्माण होत असल्याचा आरोप होत असताना, जिल्हाधिकारी यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता बोरी (चातारी) रेतीघाटावर आकस्मिक धाड टाकून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# आर्णीतील घनकचरा व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह

## नियमित कचरा संकलन होत नसल्याचा आरोप; आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी २८ मे

**आर्णी :** शहरातील घनकचरा व्यवस्थापनातील अनियमितता, मनमानी कारभार आणि नागरिकांना होत असलेल्या गैरसोयींबाबत नगरसेवक शफी ऊर्फ कालू मलनस यांनी बुधवारी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले. शहरातील कचरा व्यवस्थापनाचा कारभार अत्यंत ढिसाळ पद्धतीने सुरू असून त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

निवेदनानुसार, शहरातील सर्व भागांत नियमितपणे कचरा संकलन होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात काही मोजक्याच भागांत कचरा गाड्या जात आहेत. अनेक परिसरांमध्ये आठ-आठ दिवस कचरा गाडी पोहोचत नसल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे.



काही प्रभागांत तर आजपर्यंत कचरा गाडीच पोहोचली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नगर परिषदेला दोन वर्षांपूर्वी मिळालेल्या दोन नवीन कचरा गाड्या आजही वापराविना उभ्या असून धूळ खात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच सध्या सुरू असलेल्या तीन कचरा गाड्यादेखील काही महिन्यांपासून बंद अवस्थेत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या संदर्भात आरोग्य विभागाशी संपर्क साधला असता समाधानकारक उत्तर न मिळता उडवाउडवीची भूमिका घेतली जात असल्याचा आरोप नगरसेवक कालू मलनस यांनी केला. त्यामुळे नगर परिषद प्रशासन नेमके कोणाच्या नियंत्रणाखाली चालते, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, सर्व भागांत नियमित कचरा संकलन सुरू करावे तसेच बंद अवस्थेतील कचरा वाहने तातडीने दुरुस्त करून सेवेत आणावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अन्यथा नागरिकांच्या हितासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नगरसेवक शफी ऊर्फ कालू मलनस यांनी दिला आहे.

५
सिटी न्यूज अमरावती
गुरुवार, दि. २८ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा रविवारी दौरा

**अमरावती:** केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा रविवार, दि. ३१ मे रोजी जिल्हा दौरा आहे.

दौऱ्यानुसार, गडकरी दि. ३१ मे रोजी दुपारी १ वाजता अरुण अडसड यांच्या निवासस्थानी भेट देतील. त्यानंतर दुपारी १.३० वाजता 'अभिनंदन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड येथे भेट, दुपारी २ वाजता महेंद्र राहटगावकर यांच्या



निवासस्थानी भेट देऊन सायंकाळी ५.३० वाजता 'द लाली इम्पेरियल'च्या कन्व्हेन्शन सेंटरचे उद्घाटन करतील. सायंकाळी ६ वाजता शारीरिक शिक्षण महाविद्यालयात श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमाला उपस्थित राहतील. त्यानंतर रात्री ८.१५ वाजता अमरावतीहून नागपूरकडे प्रयाण करतील.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातून 879 बालकांना नवसंजीवनी

### अमरावती जिल्ह्यात आरबीएसके योजनेचा प्रेरणादायी प्रवास

प्रतिनिधी २८ मे

**अमरावती:** राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाशजी आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) प्रभावीपणे राबविण्यात येत असून, हा उपक्रम हजारो बालकांसाठी जीवनदायी ठरत आहे. शासनाची ही योजना केवळ आरोग्य सेवा न राहता अनेक कुटुंबांसाठी आशेचा किरण बनली आहे. या योजनेअंतर्गत गंभीर आजारांनी ग्रस्त बालकांना मोफत शस्त्रक्रिया करून नवजीवन देण्यात आले आहे. या योजनेतून मागील काही वर्षांत तब्बल ८७९ हृदय शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या असून, अनेक बालकांना मृत्यूच्या




दारातून परत आणण्यात यश आले आहे. याशिवाय ४५४७ इतर विविध शस्त्रक्रिया करून हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेष बाब म्हणजे या सर्व उपचारांसाठी पालकांना कोणताही आर्थिक खर्च करावा लागलेला नाही, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी दिली आहे.

आरबीएसके कार्यक्रमांतर्गत अंगणवाडीपासून शाळास्तरापर्यंत बालकांचे १०० टक्के आरोग्य तपासणी (स्क्रिनिंग) करण्यात येत असून, विविध आजारांचे वेळेत निदान करून तातडीने उपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. दुर्गम आणि ग्रामीण भागातील बालकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यात अमरावती जिल्ह्याने उल्लेखनीय यश मिळविले आहे.

आरबीएसके अंतर्गत जन्मजात हृदय रोग, जन्मजात नेत्र रोग, कर्णदोष, दुभंगलेले ओठ व टाळू, हर्निया, हायड्रोसील, स्क्विंट (डोळ्यांचा तिरळेपणा), दंतरोग, फायमोसीस, हाडांचे आजार तसेच टॉन्सिल्स आदी विविध आजारांवर उपचार करण्यात येत आहेत. या शस्त्रक्रियांसाठी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती, डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. पाटील कान-नाक-घसा हॉस्पीटल, आचार्य विनोबा भावे रुग्णालय सावंगी, कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल मुंबई, एसआयसीसी चिल्ड्रन हॉस्पिटल मुंबई, नेल्सन हॉस्पिटल नागपूर, किम्सवे हॉस्पिटल नागपूर, स्वास्तम हॉस्पीटल नागपूर, संजीवनी हॉस्पीटल मुंबई आदी नामांकित रुग्णालयांचे सहकार्य लाभत आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी सांगितले की, ‖आरोग्यमंत्री प्रकाशजी आबिटकर यांच्या सूचनेनुसार ही योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून प्रत्येक बालकाला योग्य उपचार मिळावेत, हे आमचे प्रमुख ध्येय आहे.

निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क) डॉ. संदीप हेडाऊ यांनी सांगितले की, 'टीमवर्क, वेळेवर रेफरल आणि सातत्यपूर्ण फॉलोअप यामुळेच आम्हाला शंभर टक्के यश मिळाले आहे. भविष्यातही अधिकाधिक बालकांपर्यंत ही सेवा पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक श्री निलेश पुंनसे यांनी अमरावती जिल्ह्यातील दुर्धर आजारांनी ग्रस्त बालकांच्या पालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. तालुकास्तरावर कार्यरत पथकांमार्फत मोफत सेवा उपलब्ध करून दिली जात असून, ही सेवा भविष्यातही अविरत सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अमरावती जिल्ह्यातील आरबीएसके योजनेचा हा प्रवास केवळ आकडेवारीपुरता मर्यादित नसून, हजारो बालकांच्या नव्या आयुष्याचा आणि त्यांच्या पालकांच्या आनंदाश्रूंचा साक्षीदार ठरत आहे.

# अमरावती जिल्हा युवक काँग्रेसचे वाढत्या महागाईविरोधात आंदोलन

प्रतिनिधी २८ मे

**अमरावती :** अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने वाढती महागाई, पेट्रोल-डिझेल दरवाढ तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर ‖मेलोडीङ्ग रील काढून देशवासीयांची केलेली टिंगल याच्या निषेधार्थ आज पेट्रोल पंपावर प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले. यावेळी नागरिकांना ‖मेलोडीङ्ग वाटप करून केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात निषेध व्यक्त करण्यात आला.

सदर आंदोलन महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रभारी अजयजी छिकारा, सहप्रभारी नवज्योतजी संधू तथा प्रदेशाध्यक्ष शिवराजदादा मोरे यांच्या नेतृत्वात पार पडले.



यावेळी प्रदेश उपाध्यक्ष अनुराग भोयर, अमरावती जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष राहुल येवले, कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगले, प्रदेश महासचिव अक्षय हेटे, सहप्रभारी अफजल बेरा, परीक्षित जगताप, रितेश पांडव, उत्कर्ष देशमुख, नितेश वानखडे, निलेश गुहे, सागर कलाने, माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे, विधानसभा अध्यक्ष नितिन काळे, वैभव देशमुख, संकेत कुलट, सर्वेश खांडे, आशीष यादव, संदीप शेंडे, तालुका अध्यक्ष श्रेयस बर्वे, संदीप मुंडे, अंकुश जुनघरे, आशीष शिंदे, दीपक भगत, सत्यजीत विधळे, ऋषिकेश वाढोकार, जय घोरे, प्रशांत गोरले, राहुल गाठे, अमित बेलकर, शुभम बांबल, लोकेश पडोळे, मयूर देशमुख, श्रीनेत राऊत, तुषार गायन, अभी बोंडे, धनराज अठोले, जय झाडखंडे, निखिल कटोलकर, जसबीर ठाकूर, श्रेयस तायवाडे, सूरज धूमनखेडे, अंकुश देशमुख, राहुल राठोड, आशीष चव्हाळे, ऋषिकेश जगताप, मनीष धुर्वे, मयूर खैरकर, राजेंद्र कासदेकर, पंकज अमोदे, रोशन झासकर, शुभम निंभोरकर, धीरज देशमुख, चेतन इतनारे, वेदांत केने, सुमेध खंडारे, लक्ष्मण राठोड यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. वाढत्या इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले असून केंद्र सरकारने तात्काळ पेट्रोल-डिझेल दर कमी करावेत, अशी मागणी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६; अल्पसंख्य माध्यमांच्या उमेदवारांसाठी विशेष परीक्षा केंद्र निश्चित

### सविस्तर माहितीसाठी www.mscepune.in संकेतस्थळ उपलब्ध

प्रतिनिधी २८ मे

**अमरावती:** शासन निर्णय दिनांक २३ ऑगस्ट २०१३ अन्वये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (ऊॅं)-२०२६ चे आयोजन रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे. सदर परीक्षा राज्यातील शिक्षक पात्रता निश्चित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते. बंगाली, कन्नड, तेलगु, गुजराथी व सिंधी माध्यमातील संबंधित सर्व विद्यार्थी व उमेदवारांनी आपल्या माध्यमासाठी निश्चित करण्यात आलेल्या जिल्ह्यांची माहिती परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर तपासून आवश्यक ती नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश चोथे यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनानुसार, बंगाली, कन्नड, तेलगु, गुजराथी व सिंधी माध्यमातील विद्यार्थी/ उमेदवारांची राज्यातील संख्या तुलनेने कमी असल्याने संबंधित उमेदवारांसाठी विशेष परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. या माध्यमांच्या उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या जिल्ह्यांमध्येच परीक्षा केंद्रे निश्चित केली जाणार असल्याची माहिती परिषदेकडून देण्यात आली आहे. सविस्तर माहितीसाठी उमेदवारांनी परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळला भेट द्यावी. संबंधित सर्व विद्यार्थी व उमेदवारांनी आपल्या माध्यमासाठी निश्चित करण्यात आलेल्या जिल्ह्यांची माहिती तपासून आवश्यक ती नोंद घ्यावी, असेही परिषदेव्दारे आवाहन करण्यात आले आहे.

# पीएम किसान योजनेच्या लाभासाठी ३० जूनपूर्वी वार्षिक ई-केवायसी आवश्यक

प्रतिनिधी २८ मे

**अमरावती:** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व पात्र शेतकऱ्यांनी केंद्र व राज्य शासनाने योजनेतील सर्व लाभार्थ्यांसाठी वार्षिक ई-केवायसी प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक आहे. चालू वर्ष २०२५-२६ साठीची ही ई-केवायसी मोहीम पूर्ण करण्यासाठी दि. ३० जून २०२६ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे.

विहित मुदतीत ई-केवायसी केली नसल्यास लाभार्थी शेतकरी आगामी हप्त्यांच्या लाभापासून वंचित राहू शकतील. योजनेतील पारदर्शकता वाढवणे, गैरप्रकार व गळती रोखणे आणि केवळ खऱ्या व जिवंत लाभार्थ्यांपर्यंतच योजनेचा पैसा पोहोचावा, हा या मोहिमेमागील मुख्य उद्देश आहे. यासाठी राज्यभरात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

लाभार्थी शेतकऱ्यांना बायोमॅट्रिक आणि फेस ऑथेंटिकेशन या दोन पद्धतींनी प्रमाणीकरण पूर्ण करता येईल. बायोमॅट्रिक प्रमाणीकरणाद्वारे ई-केवायसी करण्यासाठी शेतकरी नजीकच्या सामायिक सुविधा केंद्रावर जाऊ शकतील. तसेच शेतकरी स्वतःच्या मोबाईलवर 'पीएम-किसान' मोबाईल ॲप डाऊनलोड करून स्वतःच्या चेहऱ्याद्वारे ई-केवायसी पूर्ण करू शकतील.

वृद्ध, आजारी किंवा दिव्यांग लाभार्थ्यांना हालचालीसंबंधी अडचणी आहेत आणि केंद्रावर जाणे शक्य नाही, त्यांच्यासाठी प्रशासनाने विशेष व्यवस्था केली आहे. गाव पातळीवरील ग्रामस्तरीय नोडल अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी अशा शेतकऱ्यांकडे वैयक्तिकरीत्या लक्ष देऊन 'फेस ऑथेंटिकेशन' द्वारे त्यांची ई-केवायसी पूर्ण करण्यास मदत करतील.

जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी कोणतीही अडचणी टाळण्यासाठी दि. ३० जून पूर्वी ई-केवायसी तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन पीएम किसानचे जिल्हा नोडल अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

# प्रत्येक समाजासाठी सभागृहाचे बांधकाम करुन देणार - आ. रवी राणा

### मंजुर कुंड खुर्द येथील सभागृहाच्या बांधकामाचे लोकार्पण

प्रतिनिधी २८ मे

**अमरावती:** आ. रवि राणा यांच्या अथक प्रयत्नातून मंजूर झालेल्या कुंड खुर्द येथील बुद्ध विहाराजवळ बांधण्यात आलेल्या ३० लक्ष रुपयांच्या अत्याधुनिक सभागृहाच्या बांधकामाचे लोकार्पण उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. परिसरातील नागरिकांसाठी सामाजिक, सांस्कृतिक व विविध सार्वजनिक कार्यक्रमांसाठी हे सभागृह अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

लोकार्पण सोहळ्याला स्थानिक नागरिक, पदाधिकारी, समाजबांधव तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी आ.रवि राणा यांच्या विकासकामांचे कौतुक करत परिसराच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांबद्दल आभार व्यक्त केले.



यावेळी आ.रवि राणा यांनी सांगितले की, ‖प्रत्येक समाजाला सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच कौटुंबिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज सभागृहाची आवश्यकता असते. नागरिकांना अशा सुविधा त्यांच्या परिसरात उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. भविष्यातही प्रत्येक समाजासाठी आवश्यक त्या ठिकाणी सभागृहांचे बांधकाम करून देण्यात येईल. सदर सभागृहामध्ये विविध सामाजिक कार्यक्रम, बैठका, सांस्कृतिक उपक्रम, विवाह सोहळे तसेच समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करता येणार आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध झाली असून ग्रामीण भागातील विकासाला चालना मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कुंड खुर्द परिसरातील नागरिकांनीही या विकासकामाबद्दल आनंद व्यक्त करत आ.रवि राणा यांचे आभार मानले. सभागृहामुळे सामाजिक एकोपा वाढण्यास तसेच विविध समाजातील कार्यक्रमांना योग्य व्यासपीठ मिळण्यास मदत होणार असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. यावेळी तालुकाध्यक्ष मंगेश इंगोले, आशिष कावरे, सरपंच सुजाताताई तायडे, उपसरपंच राहुल खोरगडे, ग्रा.प.सदस्या राणी राऊत अतुल मेश्राम सह गावातील नागरिक उपस्थित होते.

## शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

प्रतिनिधी २८ मे

**अमरावती:** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश आज दि. २७ मे ते १० जुन २०२६च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या 'व्हॉट्सॲप चॅटबॉट' सेवेचा शुभारंभ

**अमरावती:** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक तसेच गट कर्ज योजनांतील लाभार्थ्यांना अधिक सुलभ, पारदर्शक व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'व्हॉट्सॲप चॅटबॉट' सेवा सुरू करण्यात आली आहे. "One Clicked Information" या विशेष संकल्पनेअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या या सुविधेमुळे आता लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जासंबंधित संपूर्ण माहिती आणि विविध प्रक्रियांची सद्यस्थिती थेट व्हॉट्सॲपवर तत्काळ प्राप्त होणार आहे.

या अत्याधुनिक सुविधेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी ८९७६८५५९२१ या क्रमांकावर ठप्ठ असे लिहून पाठवायचे आहे. हा मेसेज पाठवताच लाभार्थ्यांसमोर एक मेनू उपलब्ध होईल, ज्यामध्ये महामंडळ व योजनांची माहिती, नवीन नोंदणी संदर्भातील मार्गदर्शन, पात्रता प्रमाणपत्र स्थिती व ते डाउनलोड करण्याची सुविधा, बँक कर्ज मंजुरी स्थिती आणि व्याज परतावा दावा स्थिती यासारखे पर्याय मिळतील.

# शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी त्वरीत पूर्ण करावी

### जिल्हा प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी २८ मे

**अमरावती:** किसान सन्मान निधीचा लाभ संबंधित शेतकऱ्यांना येत्या कालावधीत मिळणार आहे. हा लाभ शेतकऱ्यांना तातडीने मिळावा, यासाठी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी त्वरीत पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

राज्य आणि केंद्र शासनाच्या मदतीचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत सुरळीत पोहोचवण्यासाठी आणि भविष्यातील सर्व योजनांसाठी पात्र होण्यासाठी सर्व शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅकची नोंदणी त्वरीत पूर्ण करावी लागणार आहे. शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणीसाठी आपला गाव नमुना, सातबारा उतारा व आधार कार्डसह आपले सरकार सेवा केंद्रावर जावून नोंदणी करून 'फार्मर आयडी' प्राप्त करून घ्यावा.

जिल्ह्यात अचलपूर ७ हजार ७२१, अमरावती १४ हजार ४७९, अंजनगाव सुर्जी ५ हजार ४११, भातकुली ७ हजार २०८, चांदूर रेल्वे ४ हजार १६४, चांदूरबाजार ८ हजार ३३४, चिखलदरा १ हजार ५५९, दर्यापूर ९ हजार ४०८, धामणगाव रेल्वे ५ हजार ८२१, मोर्शी ९ हजार १७६, नांदगाव खंडेश्वर ८ हजार ८९३, तिवसा ६ हजार ४७२, वरूड ८ हजार ७४९ खातेदार ॲग्रीस्टॅक नोंदणी करण्यापासून शिल्लक आहेत. मात्र धारणी तालुक्यात अधिकचे ७३१ खातेदार नोंदणी झाली आहे.

जिल्ह्यात एकूण ५ लाख १६ हजार १९५ खातेदार असून आतापर्यंत ४ लाख २२ हजार ६४९ खातेदारांची नोंदणी झाली आहे. अद्यापही ९३ हजार ५४६ खातेदारांची नोंदणी शिल्लक आहे.

त्यामुळे ॲग्रीस्टॅक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करून सर्व शेतकऱ्यांनी शासकीय योजनांच्या लाभासाठी पात्र व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

# जनगणना-२०२७ अंतर्गत पहिल्या टप्प्यास प्रारंभ

### नागरिकांनी स्व-गणना उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा

प्रतिनिधी २८ मे

**अमरावती:** भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने जनगणना २०२७ अंतर्गत पहिला टप्पा अर्थात घर सूचीकरण व गृहनिर्माण जनगणना (houes Listin&g housing Census) राज्यभर राबविण्यात येत आहे. हा राष्ट्रीय उपक्रम महत्त्वाच्या असून भविष्यातील नियोजन, धोरणनिर्मिती तसेच संसाधनांचे न्याय्य वितरण यासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहे.

महाराष्ट्र राज्यात या पहिल्या टप्प्यांतर्गत स्व-गणना कालावधी (Self-Enumeration Period) दि. १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत पार पडला असून नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

यानंतर प्रत्यक्ष घरभेटीमार्फत गणना (Field Enumeration – houes to houes) दि. १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या कालावधीत जनगणना अधिकारी, प्रगणक व पर्यवेक्षक नागरिकांच्या घरांना भेट देऊन आवश्यक माहिती संकलित करतील.

जनगणना अधिनियम, १९४८ व त्याअंतर्गत नियमांनुसार अचूक माहिती प्रदान करणे बंधनकारक असून नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती उपलब्ध करून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच नागरिकांना जनगणना २०२७ उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. जनगणना प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी सर्व घटकांचे सहकार्य आवश्यक असल्याचेही प्रशासनाने नमूद केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि २८ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

**माणुसकी बईमान, नाही राहीले ईमान, पैसाच महान...**


सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
फोकस
कृषी मंत्र्याच्या 'पालक' जिल्ह्यात...
बळीराजावर अन्याय, कधी मिळणार न्याय !
शासनाची 'अवकळा', जीवनाचा 'उन्हाळा'
शेतकऱ्यांची फसवणूक सावधान...
जिल्ह्यात विध्वंस !
शेतकऱ्यांचे लुटारू सक्रीय, अधिकारी निष्क्रीय...
खताची लिंकींग थांबवा, अन्यथा आंदोलन - दामुअण्णा इंगोले
अर्धा जिल्हा वगळला !
निकृष्ट खते व बियाण्यांची सर्रासपणे विक्री * बळीराजा पुन्हा अडचणीत येण्याची शक्यता * प्रशासनाने वेळीच दखल घ्यावी
बि-बियाणे व खतही मिळेना बँक पीक कर्जही देईना काय करावे कळेना...
जीवनाचा 'पंचनामा' !
अतिवृष्टीमुळे विध्वंस...
जीवनच उध्वस्त !
जीवनाचा गारा !
थोडक्यात
शालेय पोषण, विद्यार्थ्यांचे शोषण, भ्रष्ट शासन, काळ्या बाजारात राशन !
२०१८ ते २०२५ वाशिम जिल्ह्यात विद्यार्थ्यांच्या ताटातील घासच गायब, पावत्यांमधील धक्कादायक तफावत उघड



# कृत्रीम खत टंचाई, लूटण्याची घाई !

**शेतकऱ्यांची फसवणूक**

***निकृष्ट खते व बियाण्यांची सर्रासपणे विक्री * बळीराजा पुन्हा अडचणीत येण्याची शक्यता**

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

बळीराजा पेरणीच्या कामाला लागला आहे. खत बी-बियाणे खरेदी करण्याकरिता बाजारात गर्दी करीत आहे. बोगस बियाणे तथा बनावट रासायनिक खते माथी मारून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लुबाडणूक करणारी लुटारूंची टोळी पून्हा एकदा जिल्ह्यात सक्रीय झाली असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. मागील वर्षी अरिहंत कंपनीच्या बोगस सुपर फॉस्पेट खंताविरोधात कृषी विभागाकडे केलेल्या तक्रारीने ही बाब उजेडात आणली होती. यावेळेस कृषी विभागाने वेळेवर सजगपणा न दाखविल्यास शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. कृत्रीम खत टंचाई निर्माण करून डीएपी सोबत इतर बी-बियाणे व खते घेण्याचा आग्रह करीत आहे. त्या शिवाय बोगस बियाणेही जिल्ह्यात दाखल झाले असून कृषी केंद्राकडून त्याची विक्री होत असून शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. त्यामुळे कृषी विभाग तत्पर असला तरी लुटारू मात्र, सक्रीय आहेत. त्यामुळे कृत्रीम खत टंचाई दाखवून लूटण्याची घाई हे लूटारू करीत आहेत. त्यामुळे माणुसकी बईमान झाली असून इमान राहीले नाही. पैसाच महान ठरत आहे.



शेतकऱ्यांना खत दरवाढीचा फटका सोसावा लागू नये म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने खतांच्या अनुदानात भरीव वाढ केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना जुन्याच किंमतीत खते मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र काही कृषी सेवा केंद्रावर अद्यापही नवीन किंमतीनुसारच खतांची विक्री सुरू असल्याचे दिसून येत आहे. याबाबत केंद्र सरकार किंवा संबंधित कंपण्यांचे भाव कमी करण्या संदर्भातले पत्र प्राप्त न झाल्यामुळे नव्या दराने खत विक्री करण्यात येत असल्याचे कृषी सेवा केंद्र संचालकांचे मत आहे. कृषी विभागाने याबाबत पुढाकार घेवून शेतकऱ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबवावी अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

जिल्ह्यातील शेतकरी आता शेतीच्या कामाला लागला असून चांगला पाऊस पडण्याचे संकेत दिल्याने बि-बियाण्याच्या खरेदीला सुरूवात केली आहे. त्यामुळे आजमितीा शेतकऱ्यांची मशागतीसोबतच खते व बियाणे खरेदी करण्याची लगबगही सुरू झाली आहे. नेमका याच लगबगीचा फायदा घेत बाजारात शेतकऱ्यांना लुटण्यासाठी काही लुटारुंची टोळी सक्रीय झाली आहे. अधिक पैसा कमविण्याच्या हव्यासातून सदर लुटारू बोगस बियाणे किंवा खते शेतकऱ्यांच्या माथी मारून त्यांची आर्थिक पिळवणूक करण्याचा गोरखधंदा या लुटारुंकडून सुरू असते. टिएल कंपनीच्या बोगस सोयाबीन बियाणे सुपर फॉस्फेट विक्रीतून हा बोगसपणा पून्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सदर कंपनीच्या मिश्र खतांचे नमुने गुणवत्ता तपासणीत निकृष्ठ असल्याचे समोर आले असतानाही त्याची विक्री सर्रास सुरू आहे.

तर शेतकऱ्यांच्या फसवणुकीसाठी डीएपी खातासोबत नॅनो व सल्फर खाताची लिंकींग सुरू असून ती थांबविण्याची मागणी शेतकरी नेते दामुअण्णा इंगोले यांनी केली आहे. केंद्र सरकारच्या अनुदानानंतर खतांच्या किमती कमी झाल्या असतानाही काही दुकानदार वाढीव किमतीतच विक्री करीत आहेत. कृषी विभागाने हा सर्व प्रकार थाबविणे गरजेचे आहे.

## कोरोमंडल व अक्षय अदित्य कंपनीने केली होती लूट

रासायनीक खताबरोबर लिंकींग असलेली कोरोमंडल या कंपनीकडून शेतकऱ्यांची लूट झाल्याच्या तक्रारी गेल्या वर्षी केल्या होत्या . शिवाय अक्षय अदित्य कंपनीचे टिएल सोयाबीन बियाणे ही बोगस असल्यामुळे यांच्याही तक्रारी झाल्या होत्या. त्यामुळे तक्रारीनंतरही काही कृषी सेवा केंद्रातून याची विक्री सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक करून लूट करण्याच्या तयारीला काही कृषी सेवा केंद्रावाले लागले आहेत.



## पाच वर्षीच्या तक्रारीवर कारवाई नाही

कोरोनाच्या संकटात मागील चार वर्षापूर्वी बोगस बियाण्यातून शेतकऱ्यांची मोठी फसवणूक झाली होती. दुबार-तिबार पेरणीनंतरही शेतकऱ्यांनी पेरलेले बियाणे उगवलेच नाही. त्यामुळे निराश झालेल्या शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तब्बल ५ हजार तक्रारी केल्या मात्र, कंपण्या व कृषी सेवा केंद्राच्या हातातील बाहूली झालेल्या कृषी विभागाला यामध्ये काही गांभिर्य दिसले नाही. पाच वर्ष लोटले तरी या तक्रारींवर काहीच कारवाई झाली नाही ही वस्तूस्थिती आहे. बोगस बियाण्यांमधून झालेली आर्थिक हानी भरून निघावी यासाठी शेतकऱ्यांना मदतीची आस होती परंतु, त्यांचा भ्रमनिरास झाला.



## थोडक्यात

### पेरणी झाल्यावर नव्हे, पेरणीपूर्वीच सोयाबीन बियाणांच्या बॅगा द्या

**शेतकऱ्यांची शासनाकडे संतप्त मागणी**

**● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●**

तालुक्यातील घोटा, परिसरातील शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांतर्गत गावांमध्ये या बॅगांचे वितरण पेरणी संपल्यानंतर होत असल्याची संतापजनक परिस्थिती समोर येत आहे. त्यामुळे शासनाच्या योजना केवळ कागदावरच राहिल्या असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच शेतकरी शासनाच्या अनुदानित बियाण्यांच्या प्रतीक्षेत असतात. मात्र प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे पाऊस सुरू होतो, पेरण्या पूर्ण होतात आणि त्यानंतर गावात बियाण्याच्या बॅगा दाखल होतात. परिणामी शेतकऱ्यांना बाजारातून महागडे बियाणे विकत घेऊन पेरणी करावी लागत असून, नंतर मिळणाऱ्या शासकीय बॅगा गोदामात पडून राहतात. 'गरज असताना मदत नाही आणि पेरणी झाल्यावर बॅगा देऊन शासन नेमकं काय साध्य करतंय?' असा संतप्त सवाल शेतकऱ्यांतून उपस्थित केला जात आहे.




घोटा व परिसरातील अनेक शेतकरी आर्थिक अडचणींतून शेती करत आहेत. आधीच खत, औषधे, मशागत, मजुरी आणि इंधन दरवाढीमुळे शेतीचा खर्च प्रचंड वाढला आहे. त्यातच वेळेवर बियाणे न मिळाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडत आहे. अन्यथा प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांना आश्वासनाचीच बॅग मिळत राहील आणि प्रत्यक्ष मदत मात्र वेळ निघून गेल्यावरच मिळेल, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

### आ. भावनाताई गवळी यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन



**● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●**

शिवसेना पक्ष नेत्या तथा विधानपरिषद आमदार मा. भावनाताई पुंडलिकराव गवळी पाटील यांच्या हस्ते आज कारंजा लाड येथे चंदनवाडी येथील समंतभ्रद चौकातील नवीन जनसंपर्क कार्यालयाचे फित कापून थाटात उदघाटन करण्यात आले. यावेळी ताईसाहेबांनी उपस्थित शिवसैनिक, पदाधिकारी व नागरिकांशी संवाद साधताना सांगितले की, हे कार्यालय म्हणजे कारंजा लाड मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाच्या समस्या सोडवण्याचे मंदिर आहे. सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत जनतेची कोणतीही कामे येथे प्राधान्याने केली जातील. या उदघाटन सोहळ्यास शिवसेना तालुका प्रमुख मंगेश पाटील मुंदे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख वैशाली ताई येळणे, दिलीप भाऊ भोजराज, ओबीसी सेल तालुका प्रमुख अमोल पाटील भिंगारे, शहर प्रमुख अरुण बिकड, तालुका संघटक अतुल भाऊ दरेकर, शहर संघटक ॲड संदेश जिंतूरकर, युवासेना विधानसभा प्रमुख अजय दादा मते, युवासेना उपजिल्हाप्रमुख चैतन्य वक्ते उपतालुकाप्रमुख सुरेश पाटील तुरक, युवासेना तालुका प्रमुख अमोल गाडे, गणेश भाऊ श्रीराव, क्षमानंद निमगडे, युवासेना उपतालुका प्रमुख सागर मुंदे, संतोष आप्पा परसवर, धनज सर्कल संदीप पाटील टेकाडे, काजळेश्वर सर्कल प्रमुख संदीप पाटील लाहे, पोहा सर्कल प्रमुख बबन भाऊ वरगट, धामणी सर्कल प्रमुख संदीप सरस्कर, उपसर्कल प्रमुख विलास बुधे, राजेश पाटील कडू, नंदकिशोर मुंदे, दिंगबर एकनार, ज्ञानदेव ताटे, गोविंद मुंदे, ईश्वर ठाकरे, मंगेश मुंदे महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी यांच्यासह शेकडो शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कारवाईच्या टाळाटाळीचे अवलंबन...

# तीन अपत्य असलेल्या शिक्षकाचे करा निलंबन !

### पदवीधर शिक्षक असलम खान अफजल खान यांची मागणी

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

मालेगाव पंचायत समिती अंतर्गत तिवळी येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेमध्ये पदविधर शिक्षक पदी सेवेमध्ये असलेल्या शिक्षकास तिन अपत्ये आहेत. शासनाच्या २००५ च्या नियमाप्रमाणे तिन अपत्य असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याचे अधिकार आहेत. या संदर्भात पुरावे सादर केले आहेत, तसेच चौकशी सुरू असताना दोषी शिक्षकाने त्यांना तिन अपत्ये असल्याचे कबुलही केले आहे. तरीसुद्धा जि.प.चे सीईओ आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी 'त्या' शिक्षकाची पाठराखण करून दोषी शिक्षकाला सेवेतून बडतर्फ करण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचा आरोप तक्रारकर्ते पदविधर शिक्षक असलमखान अफजलखान यांनी सिटी न्यूज सुपरफास्टशी बोलतांना केला आहे. या प्रकारामुळे पुन्हा वाशीम जिल्हा परिषदेसह प्राथमिक शिक्षण विभागाच्या गलथान कारभार चव्हाट्यावर आला आहे.




मालेगाव पंचायत समिती अंतर्गत तिवळी येथील जि.प.उर्दू शाळेमध्ये अ.सलाम शेख चाँद हे पदविधर शिक्षक म्हणून सेवेमध्ये आहेत. त्यांना २००५ नंतर तिन अपत्ये हयात आहेत. शासनाच्या सन २००५ च्या आदेशानुसार शासकीय, निमशासकीय सेवेमध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यास तिन अपत्ये हयात असतील तर त्या अधिकाऱ्यास आणि कर्मचाऱ्यास सेवेतून बडतर्फ करण्याचे आदेश आहेत. 'या' तिन अपत्ये असलेल्या दोषी शिक्षकाला तिन अपत्ये असल्यामुळे 'त्या' शिक्षकास बडतर्फ करण्यासाठी मालेगाव येथील जि.प.उर्दू शाळेमध्ये कार्यरत असलेले 'जागरूक' पदविधर शिक्षक असलमखान अफजलखान यांनी वाशीम जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पुराव्यासह तक्रार देवून तिन अपत्ये असलेले दोषी शिक्षक अ.सलाम शेख चाँद यांना सेवेतून बडतर्फ करण्यासाठी एक वर्षापुर्वी तक्रार दिली होती. त्या तक्रारीनंतर तक्रारकर्ते असलमखान यांनी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांना तिनवेळा स्मरण पत्र सुद्धा दिले आहेत. तरीही जबाबदार अधिकारी तिन अपत्ये असलेले शिक्षक अ.सलाम शेख चाँद यांना पाठीशी घालून त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचा आरोप तक्रारकर्ते शिक्षक असलमखान यांनी केला आहे.

प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्याच्या अधिकारात असलेल्या या प्रकरणात जाणून बुजून दोषी शिक्षकाला सेवेमध्ये ठेवण्यासाठी वरिष्ठांचे मार्गदर्शन मागविण्याची अफलातून पळवाट जबाबदार अधिकाऱ्यांनी काढल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे. वाशीम जि.प. च्या प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा कारभार राज्यात प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ख्याती असलेल्या संजय ससाणे यांचेकडे असतांनाही तिन अपत्ये असलेल्या दोषी शिक्षकावर कारवाई होत नसल्यामुळे जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राथमिक शिक्षण विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे.

## केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात...

# आम आदमीचे निषेध आंदोलन

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

केंद्र व राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे देशभरात वाढलेली महागाई, इंधन दरवाढ, इंधन व गॅसचा तुटवडा, नीट परीक्षेतील गोंधळ तसेच शेतकऱ्यांना खत व बियाण्याचा अपुरा पुरवठा या गंभीर प्रश्नांविरोधात महाविकास आघाडी, आम आदमी पार्टी जिल्हा वाशिमच्या वतीने जाहीर निषेध आंदोलन करण्यात येणार आहे.



या आंदोलनाअंतर्गत दिनांक २९ मे २०२६ रोजी शुक्रवार दुपारी ३:०० वाजता मा. जिल्हाधिकारी साहेब, वाशिम यांना निवेदन देण्यात येणार आहे. यासाठी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी विश्राम भवन, वाशिम येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष राम पाटील डोरले यांनी केले आहे. जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर सरकार अपयशी ठरत असून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व युवक मोठ्या संकटांना सामोरे जात आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदविण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आल्याची माहिती पक्षाच्या वतीने देण्यात आली.

# अपघातातील आरोपी पळाला, अखेर पोलिसांच्या लागला गळाला !

**● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●**

पोलीस स्टेशन शिरपूर हद्दीतील ग्राम पिंपरी सरहद येथे दिनांक २०/०५/२०२६ रोजी भीषण अपघाताची घटना घडली होती. एका अज्ञात मालवाहू बोलेरो पिकअपने मोटारसायकलवरून जात असलेल्या दोघांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ग्राम तिवळी ता. मालेगाव येथील एका इसमाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा इसम गंभीर जखमी झाला होता. ही धडक देऊन अज्ञात पिकअप तिथून फरार झाली होती. शिरपूर पोलिसांनी बारकाईने अभ्यास करत अखेर त्या पिकअप चालकासह वाहनाला गळाला लावल्याने शिरपूर


गुरूवार दि २१ मे २०२६ सिटी न्यूज वाशीम वाशीम Express
लग्नावरून परतताना काळाचा घाला;
एक जागीच ठार, दुसरा गंभीर!
● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

**पिंपरी सरहद येथील घटना**

पोलिसांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

या प्रकरणी मृतकाच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन शिरपूर येथे अप क्रमांक २३३/२६ अन्वये कलम १०६(१), १२५(अ), १२५(ब), २८१ बीएनएस सह १३४, १७७, १८४ मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेची माहिती मिळताच पीआय वाघ साहेब यांनी स्वतः तपासाची सूत्रे हाती घेत पीएसआय पठाण, एचसी बालाजी, एचसी गुरुदेव, पीसी सतीश व पीसी मनोज यांच्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळ परिसरासह मेहकर तालुका (जि. बुलढाणा) परिसरातील तब्बल ३२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. सदर सीसीटीव्ही फुटेजचा अतिशय बारकाईने अभ्यास केला असता अज्ञात आरोपीच्या बोलेरो पिकअप वाहनाचे काही क्रमांक स्पष्ट दिसून आले, तर काही क्रमांक ब्लर अवस्थेत होते. पोलिसांनी तांत्रिक तपास, सीसीटीव्ही विश्लेषण व सूक्ष्म निरीक्षणाच्या आधारे अखेर सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपी व संबंधित वाहनाचा यशस्वी शोध लावला आहे. तपासादरम्यान आरोपी पिकअप चालक गजानन सुरेश वाघ, रा. पळसखेड चक्का ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा याला निष्पन्न करण्यात आले असून संबंधित बोलेरो पिकअप वाहन सध्या मेहकर पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आले आहे.

# नियमाला हरताळ, कारवाईस टाळाटाळ !

## अवैध बांधकाम पाडा, आदेशानुसार कारवाई करा - नरेंद्र गाढवे

**● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●**

कारंजा शहरात काही भूमापियांनी अवैध बांधकाम करण्याचा मोठा सपाटा लावला आहे. असाच एक प्रकार सिंधी कॅम्प कारंजा येथे उघडकीस आला आहे. सविस्तर माहिती अशी की, नरेंद्र मनोहर गाढवे यांनी कारंजा तहसीलदार यांना सीट नंबर १० प्लॉट नंबर ६०,६१ अवैध बांधकाम होत असल्याची तक्रार दिली. त्या अनुषंगाने कारंजा तहसीलदार यांनी मुख्य अधिकारी नगर परिषद यांना होत असलेल्या अवैध बांधकामाबाबत पत्राद्वारे कळविले की. उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कारंजा येथील सिंधी कॅम्प मधील गल्ली नंबर ६ प्लॉट नंबर ६० व ६१ वर दिलाराम पंजवाणी यांनी अवैध बांधकाम केलेले असून सदर बांधकाम पाडण्याबाबतचा तक्रार अर्ज तक्रादारदार यांनी या कार्यालयास सादर केला आहे. सदर प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांचा अहवाल मागविण्यात आला. सदर अहवालामध्ये अर्जात नमूद केलेल्या प्लॉटच्या जागेवर विटा सिमेंट मध्ये अर्धवट पक्के बांधकाम केले असल्याचे नमूद केले आहे. सदर प्रकरणात उप अधीक्षक भूमि अभिलेख, कारंजा यांचा अहवाल मागवण्यात आला. सदर अहवालात अर्जात नमूद केलेली जागेच्या मूळ अधिकार अभिलेखात म्हणजेच आखीव पत्रिकेवर तुळसाबाई कंकामल सिंधी यांचे नाव असून, त्या जागेवर लीलाराम ब्रिजलाल पंजवाणी यांचा ताबा असल्याचे नमुद आहे, परंतु सदर ताब्याबाबत अथवा मालकीबाबत नोंदणीकृत पुरक कुठलेही




दस्तऐवज उपलब्ध नसल्याचे व सदर जागेवर लिलाराम ब्रिजलाल पंजावाणी यांच्या घराचे बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आल्याचे नमूद केले आहे. उपरोक्त नमूद ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी तसेच उप अधिक्षक, भूमि अभिलेख, कारंजा यांच्या अहवालावरून तक्रारदार यांच्या अर्जात नमूद केलेली जागा सिंधी कॅम्प मधील गल्ली नंबर ६ प्लॉट नंबर ६० व ६१ या जागेवर बांधकाम सुरू असल्याचे नमूद असल्याने तसेच सदरची जागा ही नगरपालिका हद्दीत असल्याने सदर बांधकामास आपले स्तरावरून परवानगी दिली अथवा कसे याबाबतची तपासणी करून या प्रकरणी सक्षम् प्राधिकारी या नात्याने उक्त प्रकरणात आपले स्तरावरून योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाही बाबत संबंधित तक्रारदार यांना अवगत करावे असे लेखी पत्र तहसीलदार यांनी दिली, त्यावर नगरपरिषद यांनी दि. ८/५/२०२६ रोजी आदेश पारित केला की, अवैध बांधकाम धारक नीलाराम पंचवणी यांनी सात दिवसाच्या आत स्वतः अवैध बांधकाम निष्कासित करावे अन्यथा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अन्वये अवैध बांधकाम निष्कषित करणे करिता आदेश पारित करण्यात येत आहे. हा आदेश आज वीस दिवस होऊन सुद्धा कोणतीही कारवाईश बांधकाम अधिकारी यांनी केली नाही. तरी ताबडतोब हे अवैध बांधकाम पाडण्यात यावे अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असे तक्रारदारांनी म्हटले आहे.

# कारगिल योद्धा विष्णू रेखे यांना सैनिक रत्न पुरस्कार जाहीर

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्य तर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'सैनिक रत्न पुरस्कार २०२६' रिसोड तालुक्यातील आसेगाव पेन येथील रहिवासी असलेले सेवानिवृत्त हवालदार विष्णू पी. रेखे यांना जाहीर झाला आहे.



त्यांच्या उल्लेखनीय सैनिकी सेवेची आणि सेवानिवृत्ती नंतरही सुरू असलेल्या राष्ट्रसेवेची दखल घेऊन या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. २८ ऑक्टोबर १९९६ रोजी भारतीय सैन्याच्या २७० इंजिनिअर रेजिमेंट मध्ये भरती झालेल्या रेखे यांनी तब्बल १८.५ वर्षे देशसेवा बजावली. या कालावधीत त्यांनी जम्मू-काश्मीर, नगरोटा, श्रीनगर, कारगिल, आसाम, अरुणाचल प्रदेश, गुजरात आणि पंजाब यांसारख्या दुर्गम व संवेदनशील भागात आपले कर्तव्य बजावले. ऑपरेशन विजय अंतर्गत झालेल्या कारगिल युद्धात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून शौर्याचे दर्शन घडवले. याशिवाय गुजरातमधील महापुराच्या वेळी त्यांनी रेस्क्यू ऑपरेशनमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या या समर्पित सेवेबद्दल त्यांना ऑपरेशन विजय मेडल, ऑपरेशन स्टार, स्पेशल सर्विस मेडल, ऑपरेशन रक्षक मेडल, लॉंग सर्विस मेडल, हाय अल्टिट्यूड मेडल, सेना सेवा मेडल आणि ण्ठ्ठ्एइ ब्ठ यांसारख्या अनेक सन्माननीय पदकांनी गौरविण्यात आले आहे. सेवानिवृत्तीनंतरही त्यांची राष्ट्रसेवा थांबली नाही. एप्रिल २०१६ मध्ये ऍं रेकॉर्डद्वारे त्यांची नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (ऱ्एअ्ञ) अंतर्गत प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेमध्ये 'मास्टर ट्रेनर' प्रशिक्षणासाठी लंडन येथे निवड झाली.

# अमरावती- सुरत एक्स्प्रेस आजपासून धावणार!

**नांदुरा:** रेल्वे प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने रेल्वे प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. अमरावती-सुरत एक्स्प्रेसच्या पारंपरिक आयसीएफ रेकऐवजी आता आधुनिक एलएचबी (लिंक हॉफमन बुश) कोचचा समावेश करण्यात येणार आहे. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक २०९२६ अमरावती-सुरत एक्स्प्रेस ही अमरावती येथून दि. २९ मेपासून एलएचबी कोचसह धावणार आहे, तसेच गाडी क्रमांक २०९२५ सुरत-अमरावती एक्स्प्रेस सुरतयेथून दि. २८ मे पासून एलएचबी रेकसह सुरू होणार आहे. एलएचबी कोच हे पारंपरिक डब्यांच्या तुलनेत अधिक सुरक्षित मानले जातात. या डब्यांमध्ये प्रवासादरम्यान कमी धक्के बसतात, आवाज कमी होतो तसेच उच्च वेगातही स्थिरता अधिक राहते. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, सुधारित रचनेत गाडीला एकूण १६ डबे असतील. यामध्ये १ वातानुकूलित चेअर कार, ४ द्वितीय श्रेणी चेअर कार, २ स्लीपर कोच, आणि १ जनरेटर व्हॅनचा समावेश राहणार आहे.

# साडे चार लाखांचे प्रतिबंधीत कापूस बियाणे जप्त

प्रतिनिधी २८ मे

**संग्रामपूर:** कृषी विभागाच्या जिल्हा पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार केलेल्या कारवाईत साडेचार लाख रुपयांच्या प्रतिबंधित (एचटीबीटी) कापूस बियाण्यासह एक इको वाहन असा एकूण ८ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संग्रामपूर पंचायत समितीचे कृषी अधिकारी रविकिरण नावकार यांनी तामगाव पोलिसात दिलेल्या फिर्यादवरून अकोला जिल्ह्यातील आरोपीविरुद्ध करण्यात आली. तीन कारवाई या घटनेत धूम टु नावाचे २६९ पाकीट व आयपीएल चॅम्पियन नावाचे १०० पाकीट असे एकूण ४५८ कापूस



बियाण्याचे पाकीट जप्त करण्यात आले आहेत. यातील आरोपी गुलाबराव मुरलीधर ठाकरे' शंकर दांदले दोन्ही रा. सांगोळा तालुका पातुर व फरार विनोद पाटील उर्फ विनोद वाघमारे रा. शिर्ला अंधारे यांचेविरुध्द बियाणे कायदा १९६६ बियाणे नियम १९६८ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कापूस बियाणे अधिनियम २००९ अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार कारवाई करण्यात आली. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पथकातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पाळत ठेवून वरवट बकालकडून शेगाव दिशेने जात असलेले इको वाहन मंगळवारी सायंकाळी ५ वाजता खिरोडा फाट्यावर थांबवून ही बियाणे जप्तीची कारवाई केली. सदर आरोपी प्रतिबंधित बियाण्याची विक्री करण्याच्या प्रयत्नात होते, असे समजल्यावरून हे बियाणे जप्त करून आरोपींना ताब्यात घेण्यात आले. या कारवाई पथकात पीएसआय सोनोने व कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा पुरुषोत्तम अंगाईत 'मोहीम अधिकारी यवतमाळचे प्रमोद गायके गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक गणेश सावंत संग्रामपूरपंचायत समितीचे कृषी अधिकारी रविकिरण नावकार कृषी अधिकारी गुण नियंत्रण कु. रोहिणी बोढे, कृषी अधिकारी गुण नियंत्रण जळगाव जामोदचे अजिंक्य भटकर, शेगाव कृषी गुण नियंत्रण अधिकारी जानोजी पवार, सहाय्यक कृषी अधिकारी रवींद्र जाधव संग्रामपूर कनिष्ठ लिपिक धनंजय देवकर इत्यादींचा या कारवाई त सहभाग होता.कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी ही धडाकेबाज कारवाई यशस्वी केली, असे सांगण्यात आले. जप्त केलेल्या बियाण्याचे नमुने नागपूर येथे प्रयोगशाळेत पाठवल्याचे संग्रामपूर पंचायत समितीचे कृषी अधिकारी रविकिरण नावकर यांनी आज सांगितले. पुढील तपास पोलीस निरीक्षक सोनवणे यांचे मार्ग दर्शना खाली तामगाव पोलीस करत आहेत.

# गॅस एजन्सींचा मनमानी कारभार; ग्राहकांकडून अतिरिक्त वसुली?

## गोदामातून सिलिंडर आणूनही डिलिव्हरी शुल्काची आकारणी

प्रतिनिधी २८ मे

**खामगाव:** गॅस एजन्सीच्या गोदामातून स्वतः जाऊन सिलिंडर आणूनही ग्राहकांकडून प्रत्येकी २९ रुपये डिलिव्हरी शुल्क आकारले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या प्रकारामुळे शहरातील गॅस एजन्सींच्या कारभाराविरोधात ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गॅस वितरणातील अकार्यक्षमता, अतिरिक्त शुल्क आकारणी, अपुरी माहिती व्यवस्था तसेच सिलिंडर पुरवठ्यातील अनागोंदीमुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. गॅस कंपन्यांकडून पुरवठा सुरळीत असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात ग्राहकांना सिलिंडरसाठी तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे. महिलांसह ज्येष्ठ नागरिकांनाही उन्हात प्रतीक्षा करावी लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दरवाढ लागू होण्यापूर्वी कमर्शियल सिलिंडर बुक केलेल्या ग्राहकांकडूनही वाढीव दर आकारले जात असल्याचा आरोप व्यावसायिकांनी केला आहे. शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक रक्कम वसूल केली जात आहे. विशेष म्हणजे, ग्राहक स्वतः गोदामात जाऊन सिलिंडर घेऊन जात असतानाही त्यांच्याकडून डिलिव्हरी शुल्क आकारले जात असल्याने या प्रकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# इंधन बचतीसाठी शिवसेना (उबाठा) चे उपविभागीय अधिकारी मार्फत परीवहन मंत्र्यांना निवेदन

## प्रवाशांवरील कारवाई शिथिल करण्याची मागणी

प्रतिनिधी २८ मे

**मलकापुर:** राज्यात वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर डिझेल-पेट्रोल बचतीसाठी वाहनांमध्ये अतिरिक्त प्रवाशांना व दुचाकीवर ट्रिपल सिट ला परवानगी देण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.शिवसेना उपजिल्हा प्रमुख गजानन ठोसर यांनी उपविभागीय अधिकारी मलकापूर यांचे मार्फत परीवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी नागरिकांना इंधन बचतीचे



आवाहन केले आहे. मात्र आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येक कुटुंबाकडे एकापेक्षा अधिक वाहने असून शेतकरी, मजूर व सर्वसामान्य नागरिक रोजच्या कामासाठी वाहनांचा वापर करतात. अशा परिस्थितीत दुचाकीवर तीन प्रवासी व चारचाकी वाहनांमध्ये काही अतिरिक्त प्रवाश्यांना प्रवासाची मुभा दिल्यास इंधन बचतीला मोठी मदत होऊ शकते, असे निवेदनात म्हटले आहे.

तसेच, पेट्रोल टंचाई किंवा इंधन बचतीच्या दृष्टीने दुचाकीवरील ट्रिपल सीट तसेच चारचाकी वाहनांतील अतिरिक्त प्रवाशांवर होणारी पोलिस कारवाई शिथिल करण्याचे निर्देश आर.टी.ओ व पोलीस विभागाला देण्यात यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेश सिंह राजपूत, शिवसेना शहर प्रमुख हरिदास गणबास, उपशहर प्रमुख बाळू पोलाखरे,किसान सेना उपतालुकाप्रमुख गजानन मेहेंगे,ऐसेना शहरप्रमुख इम्रान लकी, बाळू खोटाळे, शाखाप्रमुख शेख रफीक भाई, सादिक खान सह आदींच्या सह्याद नमूद आहे. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी बुलढाणा तसेच मलकापूर शहर पोलीस स्टेशनलाही देण्यात आली आहे.

# सफाई कामगारांना धमकी व जातिवाचक शिवीगाळ नगरसेवकाविरोधात कारवाईची प्रशासनाकडे मागणी

प्रतिनिधी २८ मे

**खामगाव:** प्रभाग क्रमांक १२ मधील नगरसेवक तहसीन शाह कासम शाह यांच्याकडून मुकरदम व सफाई कामगारांना वारंवार त्रास दिला जात असल्याचा आरोप करत त्यांचेवर कार्यवाही करून मुकरदम व सफाई कामगारांना संरक्षण व न्याय द्यावा, अशी मागणी करत सकल मेहतर समाज बांधवांच्या वतीने नगर परिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

सदर निवेदनात गेल्या महिनाभरापासून संबंधित नगरसेवक व त्यांच्या सहकाऱ्यांकडून सफाई कामगारांना नाहक त्रास दिला जात असल्याचे म्हटले आहे. यापूर्वीही काही वाद निर्माण झाले होते. मात्र, कामगारांनी सलोख्याची भूमिका घेत प्रकरण मिटविले होते. मात्र २७ मे रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास प्रभागातील दैनंदिन सफाईचे काम सुरू असताना पुन्हा वाद



झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावेळी संबंधित नगरसेवकांनी मुकरदम व सफाई कामगारांसोबत वाद घालून शिवीगाळ केली, कॉलर पकडली. तसेच खोट्या तक्रारी देण्याची व जीवे मारण्याची धमकी दिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच जातीवाचक शिवीगाळ केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेऊन संबंधितांवर कार्यालयीन कार्यवाही करावी तसेच सफाई कामगारांना संरक्षण व न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अन्यथा भविष्यात काही अनुचित घटना घडल्यास त्यास जबाबदार कोण राहणार? असा सवालही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे.

# महात्मा फुले चित्ररथाचे काँग्रेस कडून उत्साहात स्वागत

प्रतिनिधी २८ मे

**खामगाव :** क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे तयार करण्यात आलेला चित्ररथ दि.२६ मे रोजी खामगाव शहरात दाखल झाला. यावेळी स्थानिक टॉवर चौकात अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून चित्ररथाचे जल्लोषात स्वागत करण्यात येवून महापुरूषांच्या पुतळ्याचे पुजन करण्यात आले.

शासनाकडून ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ या कालावधीत 'महात्मा फुले द्विशताब्दी जयंती वर्ष' विविध उपक्रमांनी साजरे केले जात आहे. त्याअनुषंगाने ना. छगन भुजबळ यांच्या संकल्पनेतून अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे भव्य चित्ररथ साकारण्यात आला आहे. या चित्ररथात महात्मा जोतीराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्यासह छत्रपती शाहू महाराज व डॉ.



बाबासाहेब आंबेडकर यांच्या आकर्षक प्रतिकृतींसह ऐतिहासिक भिडे वाडा आणि मुलींच्या पहिल्या शाळेची हुबेहूब प्रतिकृती साकारण्यात आली आहे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे कार्य, इतिहास सर्व सामान्यांपर्यंत पोहोचवा आणि त्यांच्या सामाजिक कार्याचा व समतेच्या विचारांचा प्रचार व्हावा, या उद्देशाने हा विशेष चित्ररथ राज्यभर फिरवला जात आहे. मंगळवारी सकाळी या चित्ररथाचे खामगाव येथील टॉवर चौकात आगमण झाले. यावेळी काँग्रेस पक्षाकडून चित्ररथाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. तसेच महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी माळी सेवा मंडळाचे अध्यक्ष धोंडीराम खंडारे, सचिव प्रदीप सातव, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष गवळी, काँग्रेस पक्षाचे अनु. जाती विभाग अध्यक्ष ॲड. अशोक इंगळे, तालुकाध्यक्ष तेजेंद्रसिह चव्हाण, शहराध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, काँग्रेस ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटी महासचिव संजय तायडे, जिल्हा संघटन सचिव अतुल सिरसाट, अल्पसंख्यांक जिल्हा उपाध्यक्ष अस्लम पटेल, शहर काँग्रेस सोशल मिडिया ब्लॉक अध्यक्ष अक्षय शंकरवार, गिरीश देशमुख, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष राहुल राऊत, शहराध्यक्ष संतोष वानखडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोज वानखडे, गुरुदेव सेवा मंडळाचे मनिष देशमुख, जयेश वावगे, योगेश हजारे, विकास बगाडे, क्षत्रिय माळी परिषदेचे अध्यक्ष राजु आसोलकर, प्रमोद सातव, रविंद्र गोलाइत, किशोर वानखडे, सुजित तायडे, विश्वनाथ सातव, सुधाकर वावगे, गणेश खिरोडकर यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे व राजकीय पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र शेगाव येथे श्री परमहंस परशराम महाराज यांच्या महिमा ग्रंथांचे सामूहिक पारायण सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी २८ मे

**शेगाव:** श्री परमहंस परशराम महाराज सेवाधारी परिवार, जळतापूर /पिंपळोद यांच्या वतीने रविवार ७ जून २०२६ रोजी श्रीक्षेत्र शेगाव येथे भव्य सामूहिक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री परमहंस परशराम महाराज यांच्या महिमा ग्रंथांचे पारायण सकाळी ८.३० वाजता सुरू होणार असून हा ऐतिहासिक सोहळा श्री माहेश्वरी भवन, एसटी स्टँडसमोर, शेगाव, जिल्हा बुलढाणा येथे संपन्न होणार आहे.

या धार्मिक व ऐतिहासिक सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. तसेच आदल्या दिवशी येणाऱ्या भक्तांसाठी शनिवार ६ जून २०२६ रोजी श्री माहेश्वरी भवन

निवासाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. सोहळ्याचे आयोजन श्री परमहंस परशराम महाराज सेवाधारी परिवार, जळतापूर /पिंपळोद यांच्या वतीने करण्यात आले असून विविध भागांतील सेवाधारी समाजबांधव या आयोजनात सक्रिय सहभाग घेत आहेत. व आयोजक सेवाधारी म्हणून जयंत सुरेशराव वानखडे (खामगाव/अमरावती), गोकुळ शेगोकर (आकोट), शंकरराव खवले (लोखोंडा), शरदराव

देवरणकर (अध्यक्ष, शैव गुरव हितकारणी मंडळ, अमरावती), जयंत पुसदकर (निळकंठेश्वर संस्था अध्यक्ष, अमरावती), भालचंद्रराव कथलकर (अंतरगाव गुरव), राजूभाऊ कथलकर, अशोकराव भारसाकळे, प्रशांत देशमुख, परशराम डोरस, पुरुषोत्तमराव खंडार, सुरेशराव रोहनकर, कैलासराव डांगे, शुभमराव पुसतकर, ओमभाऊ मोरे, मोहनराव पंडीत इतर मंडळी परिश्रम घेत आहेत.तसेच ज्या भक्तांकडे महाराजांचा महिमा ग्रंथ उपलब्ध नसेल त्यांनी जयंत सुरेशराव वानखडे व गोकुळ शेगोकर यांच्याशी संपर्क साधावा. या पारायण सोहळ्यासाठी भाविकांनी तात्काळ नोंदणी करावी, असे आवाहन आयोजक मंडळाच्या वतीने जयंत वानखडे मोबाईल नंबर ९७ ६३७२ ९१ ३१ करण्यात आले आहे.

# जळगाव जामोद येथे कॉटन मार्केट परिसरात गांजा विक्री, दोघांवर गुन्हा दाखल

## दोन लाखांहून अधिक रुपयांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २८ मे

**जळगाव जामोद:** शहरातील कॉटन मार्केट परिसरात जळगाव जामोद पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकून गांजासह दुचाकी व मोबाइल, असा दोन लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांविरुद्ध २६ मे रोजी एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी पंचासमक्ष छापा टाकला असता आरोपींकडून २ किलो ३७० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. जप्त गांजाची अंदाजित किंमत १ लाख १८ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत ७२ हजार रुपये किमतीची दुचाकी (एमएच ३० बीक्यू ०२४५) तसेच १२ हजार रुपये किमतीचा मोबाइल, असा एकूण २ लाख २ हजार

५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी उत्तम शहादेव तायडे (५५, रा. दानापूर, ता. तेल्हारा, जि. अकोला) तसेच जैस्वाल बाई (रा. कुन्हा काकोडा, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. स.पो.नि. नागेश प्रकाश मोहोड यांच्या फिर्यादीवरून जळगाव जामोद पोलिस स्टेशनमध्ये कलम ८ (क), २० (ब) (ग्ग्), २९ एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई सहायक फौजदार विनोद गायकवाड यांनी केली असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक नारायण सरकटे करीत आहेत.

# फेरीवाल्यांमुळे मुख्य वाहतूक कोंडी; थेट रस्त्यावरच लावतात फळांच्या गाड्या

## दररोज रहदारीला मोठा अडथळा; नागरिक त्रस्त

प्रतिनिधी २८ मे

**खामगाव:** शहरातील प्रमुख व्यापारी केंद्र असलेल्या मुख्य रस्त्यावर फेरीवाल्यांमुळे वाहतुकीची समस्या गंभीर बनत चालली आहे. विशेषतः हातगाडीवर फळविक्री करणारे विक्रेते थेट रस्त्यावरच गाड्या लावत असल्याने वारंवार वाहतूक कोंडी होत असून, नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. मेन रोड हा शहरातील सर्वाधिक वर्दळीचा मार्ग मानला जातो. या भागात दिवसभर वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. मात्र, रस्त्याच्या दुतर्फा दुकानांसमोर मोठ्या प्रमाणावर दुचाकी आणि चारचाकी वाहने उभी केली जात असल्याने



आधीच रस्त्याची जागा कमी होते. त्यातच फेरीवाले वाहनांसमोर हातगाड्या उभ्या करून फळविक्री करतात. काही विक्रेते तर थेट रस्त्याच्या मध्यभागीच गाड्या उभ्या करत असल्याने रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. वाहतूक कोंडी झाल्यानंतरही संबंधित विक्रेते हातगाड्या बाजूला घेत नसल्याच्या तक्रारी आहेत.सायंकाळच्या वेळेत वाहतूक कोंडी मुख्य रस्त्यावर सायंकाळच्या वेळेत वाहतूक कोंडीची समस्या अधिक गंभीर होत असल्याचे चित्र दिसून येते. बाजारपेठेत ग्राहकांची गर्दी वाढत असल्याने रस्त्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ सुरू असते. परिणामी अनेकदा वाहनांच्या रांगा लागून संपूर्ण मार्ग ठप्प होतो.

रस्त्याच्या दुतर्फा उभी असलेली वाहने, फेरीवाल्यांच्या हातगाड्या आणि वाढती रहदारी यामुळे वाहतुकीसाठी अत्यंत कमी जागा उपलब्ध राहत आहे. यामुळे वाहनधारक त्रस्त झाले आहेत.

**उपाययोजनांची नागरिकांची मागणी**

वाढत्या वाहतूक कोंडीच्या समस्येकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. रस्त्यावरील वाढते अतिक्रमण, फेरीवाल्यांच्या हातगाड्या आणि अनियंत्रित पाकिंगमुळे रहदारी विस्कळीत होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. फेरीवाल्यांसाठी स्वतंत्र जागा निश्चित करणे, रस्त्यावरील अतिक्रमण हटविणे, अनधिकृतपणे रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. २८ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# शहरात बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी




## हरिहर पेठ येथील ईदगाहवर ईद ची नमाज अदा

प्रतिनिधी २८ मे

**अकोला :** आज देशभरात मोठ्या थाटामाटात बकरी ईद साजरी झाली. बकरीईदला ईद-उल-अजहा, ईद-उल-जुहा किंवा ईद-उल-बकरा या नावांनीही ओळखले जाते. हा सण त्याग आणि मानवतेचे प्रतीक मानला जातो. इस्लाममध्ये याला 'बलिदानाचा सण' असेही म्हटले जाते. इस्लामिक कॅलेंडरनुसार, प्रत्येक वर्षीच्या ईदची तारीख चंद्राच्या स्थितीवर आधारित असते. ईद-उल-अजहा जुलहिज्जाच्या १० व्या तारखेला साजरी केली जाते, जी रमजान संपल्यानंतर ७० दिवसांनी येते. अकोला शहरात सुद्धा बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली शहरातील हरिहर पेठ परिसरातील ऐतिहासिक ईदगाह तसेच अन्य ईदगाह व मज्जिद मध्ये बकरी ईद ची नमाज अदा करण्यात आली. नमाज अदा करण्यात आल्यानंतर प्रत्येकाने एक दुसऱ्यांची गळा भेट घेत बकरी ईद च्या शुभेच्छा दिल्या. नमाजच्या आधी शहरातील मोहम्मद अली चौकातून हरिहरपेठ परिसरातील ईदगापर्यंत पवित्र निशान ची शोभायात्रा काढण्यात आली यात मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते. नमाज पठण केल्यानंतर जगात शांतता राहावी यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली त्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या गळा भेटी घेत ईदच्या शुभेच्छा दिल्या यावेळी मोठ्या संख्येने ईदगावर मुस्लिम बांधव उपस्थित होते दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून ईदगाह शहरात सर्वत्र तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता

# शिक्षणावर एकलव्यासारखे लक्ष केंद्रित करा यश निश्चित मिळेल– नागोरावजी लाटे

## ♦ मराठा सेवा संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



प्रतिनिधी २८ मे

**अकोला :** मराठा समाजातील यंदा दहावी व बारावी ७०इहून अधिक गुण प्राप्त करीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन दरवर्षीप्रमाणे यंदाही मराठा सेवा मंडळ तर्फे करण्यात आले बुधवार २७ मे रोजी सायंकाळी सहा वाजता शहरातील निवडी परिसरात असलेल्या पत्रकार भवनात कार्यक्रम मान्यवर अतिथींच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सर्वश्री प्रशांतजी जानोळकर, गजानन थिटे, सुधीर मांडवे अनिल बिडवे शाम माहेश्वरी मारुतीराव भगत सूर्यकांत अंधारे कैलास गाढवे गोविंदराव मांडवे कैलास दळवी रितेश मिर्जापुरे राजेश भाऊ मोरे मनोज चव्हाण मराठा सेवा संघाचे अध्यक्ष मुरलीधर सटाले उपाध्यक्ष पंडित चौधरी सचिव गणेश गिराम सहसचिव प्रदीप लुगडे लेखापाल सुनील चव्हाण नारायणराव गारोळे गोविंदराव मांडवे चंद्रकांत पन्हाळकर उमाकांत जाधव गजानन थिटे गजानन देव श्रीकृष्ण जाधव सुबोध वाकडे कैलास दळवी नागोरावजी लाटे संजय केंदळे कैलास गाढवे आशिष जाधव सूर्यकांत चव्हाण प्रवीण शिंदे हनुमंत चव्हाण विपुल माने राजेश अंधारे बंटी सटाले अनिल मोठे उमेश जरांगे संभाजी खेडकर आदी उपस्थित होते कुलदेवता तुळजाभवानी माता जिजाऊ तथा छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे अतिथींच्या हस्ते पूजन करण्यात आल्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली.

सर्वच विद्यार्थ्यांनी जर जीवनात यशस्वी व्हायचे ठरवल्यास एकलव्यासारखे आपले लक्ष शिक्षणाकडे केंद्रित करावे यश निश्चितच आपले आहे असे मत श्री नागोराव लाटे यांनी व्यक्त केले अन्य मान्यवरांनी सुद्धा विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले. सर्वच यशस्वी विद्यार्थ्यांना मराठा सेवा संघातर्फे रोख पुरस्कार व भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाची उपस्थित विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांनी सुद्धा भरभरून प्रशंसा केली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गुणवंत विद्यार्थी त्यांचे पालक तसेच समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते मराठा सेवा महिला मंडळाच्या अध्यक्ष माधुरी बिडवे सौ शारदा सटाले मंगला जाधव शितल चव्हाण सुनीता दळवी सौ इंदिरा आवटे सुनंदा थिटे लीला केंदळे मनीषा शिंदे शितल चव्हाण प्रिया चव्हाण सारिका नाईकनवरे कमल देव योगिता मांडवे रोहिणी ताई पाटोळे कल्पना जाधव आरती बागडे अर्चना मांडवे हर्षा भांड व दर्शना खेंडकर नीलिमा विनोद चव्हाण आरती भागडे सौ स्वाती खेडकर रजनीताई इथापे राणी पंकज गाढवे पूजा, कविता गुंजाळ रोहिणी मोठे आधी महिला मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सुद्धा गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले कार्यक्रमाला उपस्थित सर्व विद्यार्थी पालक व समाज बांधवांसाठी स्नेह भोजनाची व्यवस्था श्री नागोरावजी लाटे यांच्यातर्फे करण्यात आली होती. अत्यंत सुंदर रित्या संपन्न झालेल्या या कार्यक्रमाची उपस्थित सर्वांनी मुक्त कंठाने प्रशंसा केली

# अकोल्याच्या खंडेलवाल ज्वेलर्सचे 9 वे दालन आता जालन्यात !

## ♦ बुलडाण्याचेही स्थानांतरण, सिनेतारका प्राजक्ता माळी यांची उपस्थिती

प्रतिनिधी २८ मे



**अकोला :** ९ दशकांपासून आपल्या पारदर्शी व्यवहारांमुळे सोने-चांदीच्या व्यवसायात संपूर्ण विदर्भात अग्रेसर असलेल्या, रवी नितीन खंडेलवालांचे, खंडेलवाल ज्वेलर्स, विदर्भासोबतच आता मराठवाड्यात प्रवेश करीत आहे. मराठवाड्यातील स्टील हब म्हणून वेगाने पुढे येत असलेल्या जालना शहरात हे ९ वे दालन प्रारंभ होत असल्याची माहिती संचालक नितीन खंडेलवाल यांनी दिली.

येत्या ३१ मे रोजी जालना येथील, बडी सडक, आदित्य कॉम्पलेक्समध्ये हे भव्य दालन साकार होत असून, सुप्रसिद्ध सिनेतारीका, हास्य जत्रा फेम, प्राजक्ता माळी यांची प्रमुख उपस्थिती या शुभारंभप्रसंगी राहणार आहे. तसेच जेम्स ॲन्ड ज्वेलरी डोमेस्टीक कौन्सिलचे, राष्ट्रीय उपाध्यक्ष, हैद्राबाद येथील अविनाशजी गुप्ता हे याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. ६ व्या पिढीतील हर्षल नितीन, प्रतीक रवी आणि सौ. शौर्या आणि सौ. रिषीका याही व्यवसायात नव्याने पदार्पण करुन हातभार लावत असल्यामुळे कार्यक्षेत्र वाढविण्यात येत असल्याचेही खंडेलवाल यांनी सांगितले. त्याचप्रमाणे १ जून रोजी बुलढाणा येथील शोरुमचेही स्थानांतरण होत असून बुलढाणा येथील केजे-५ ग्राहकांच्या अधिक उत्तम सेवेसाठी, अधिक प्रशस्त व आकर्षक स्वरुपात, सराफा लाईन मधील, जनता चौकात स्थानांतरीत करण्यात येत आहे. याठिकाणीही १ जून रोजी प्राजक्ता माळी यांची उपस्थिती राहणार असून, बुलढाणा जिल्ह्यातील मातब्बर व्यक्तिमत्त्व, बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. खंडेलवालांच्या परंपरेला साजेसे सर्व प्रकारातील दागिने, सोने, चांदी, डायमंड ज्वेलरी, प्लॅटीनम या शिवाय सर्व नाविन्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण ज्वेलरी या दोन्ही दालनात भरगच्च स्वरुपात उपलब्ध राहणार असून, आजच्या पिढीला आवडतील असे कमी वजनातील दागिने, ब्रेसलेट्स, अंगठ्या, कानातले, अगणित प्रकारात उपलब्ध आहेत. जालना आणि बुलढाणा या दोन्ही ठिकाणी आमच्या मान्यवर ग्राहकांनी भेट देऊन आमच्या दालनातील ज्वेलरी, पारंपरिक दागिने, डायमंड ज्वेलरी, एकदा डोळ्याखालून घालावी, अशी नम्र विनंतीही या निमित्ताने नितीन खंडेलवाल यांनी खंडेलवाल ज्वेलर्सतर्फे केली आहे.

# महात्मा फुले ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षपदी अतुल नाथे

प्रतिनिधी २८ मे



**अकोट :** महात्मा फुले ब्रिगेडच्या अकोला जिल्हाध्यक्षपदी अकोट येथील सामाजिक कार्यकर्ते अतुल नाथे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. २६ मे रोजी आयोजित विद्यार्थी गुणगौरव समारंभात महात्मा फुले ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष स्वप्नील बोबडे यांनी अतुल नाथे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत जिल्हाध्यक्षपदी नियुक्तीची घोषणा केली.

यावेळी संघटनेच्या अकोला जिल्हा उपाध्यक्षपदी आशिष बेलोकार, सचिवपदी विशाल काळे, तालुकाध्यक्षपदी सुनिल काळे तसेच शहराध्यक्षपदी अतुल मुरेकर यांचीही नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# जिल्हा कारागृहात एका पाठोपाठ दोन कैद्यांच्या अचानक मृत्यूमुळे उडाली खळबळ

प्रतिनिधी २८ मे

**अकोला :** जिल्हा कारागृहात एका पाठोपाठ दोन कैद्यांच्या अचानक मृत्यूमुळे उडाली खळबळ. मृत्यूचे खरे कारण दोन्ही कैद्यांचा शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होऊ शकेल.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत पावलेल्या दोन कैद्यांपैकी एक दीपक रामदास चतरकर (४२) असून, तो तेल्हारा तालुक्यातील बेलखेड येथील रहिवासी होता. तेल्हारा न्यायालयाने शुक्रवार, २२ एप्रिल रोजी दीपक चतरकर याला एका खून प्रकरणात तुरुंगात पाठवले होते. सोमवार, २५ मे च्या रात्री त्याची प्रकृती अचानक खालावली. जेल प्रशासनाने त्याला तातडीने अकोल्याच्या सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले, परंतु उपचार सुरू होण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

दुसरी घटना मंगळवार, २६ मे रोजी घडली. ज्यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव येथील रहिवासी प्रल्हाद पांडुरंग रायपुरे (६६) यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तिथे त्यांचा मृत्यू झाला. रायपुरे यांना बुलढाणा जिल्हा सत्र न्यायालयाने २९ जानेवारी रोजी कलम ३०२ अंतर्गत तुरुंगात पाठवले होते. लागोपाठ दोन दिवसांत दोन कैद्यांचा मृत्यू झाल्याने मध्यवर्ती कारागृह प्रशासनात कमालीची खळबळ उडाली आहे. पोलीस या दोन्ही प्रकरणांचा तपास करत आहेत.

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात निघाला रूट मार्च

## रूट मार्चमध्ये मोठ्या संख्येने पोलीस जवान सहभागी

प्रतिनिधी २८ मे



**अकोला :** शहरात साजरी होणाऱ्या बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर, शहरातील विविध परिसरांमध्ये पोलिसांनी शक्तीप्रदर्शन करत रूट मार्च काढला. या रूट मार्चच्या माध्यमातून पोलिसांनी शक्तीप्रदर्शन करत नागरिकांमध्ये सुरक्षेची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला.

आगामी बकरी ईद आणि विविध सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या उद्देशाने, रविवारी अकोला पोलीस विभागाच्या वतीने शहरात भव्य रूट मार्च काढण्यात आला. मुख्य बाजारपेठ, संवेदनशील भाग आणि प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या या रूट मार्चच्या माध्यमातून पोलिसांनी शक्तीप्रदर्शन करत नागरिकांमध्ये सुरक्षेची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, नुकतेच राज्य शासनाने बकरी ईददरम्यान गोवंश हत्या होऊ न देण्याचे स्पष्ट निर्देश दिल्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात विशेष खबरदारी घेतली जात आहे. याच अंतर्गत पोलिसांकडून विविध भागांत पाळत आणि सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. नुकतीच जिल्ह्यात काही गोवंश तस्करांवर कारवाई देखील करण्यात आली आहे. बकरी ईदसह आगामी सण शांततापूर्ण आणि सलोख्याच्या वातावरणात साजरे व्हावेत, यासाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे सतर्क आणि सज्ज असल्याचे दिसून येत आहे. हा रूट मार्च पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक रेड्डी आणि पोलीस उपविभागीय अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यामध्ये शहरातील सर्व पोलीस ठाण्यांचे अधिकारी, कर्मचारी, पोलीस जवान आणि पोलीस वाहने मोठ्या संख्येने शिस्तबद्ध रीतीने सहभागी झाली होती.

# शासकीय दूध डेअरीसमोर अचानक आग



प्रतिनिधी २८ मे

**अकोला :** शहरातील शासकीय दूध डेअरीसमोर गुरुवारी अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आग लागल्यानंतर काही क्षणातच बाजूला असलेल्या मोठ्या पिंपळाच्या झाडाने पेट घेतल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट दूरवर दिसत असल्याने परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. आग पसरू लागल्याने धावपळ करावी लागली. आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, घटनेची चौकशी सुरू आहे. या अचानक लागलेल्या आगीमुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

# शेतरस्त्यासाठी बळीराजा आक्रमक

## ♦ उरळ येथील शेतकरी छेडणार आंदोलन

प्रतिनिधी २८ मे



**अकोला :** केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या ईमेलनंतरही अकोल्यातील 'उरळ बु.' येथील शेत रस्त्यांची दुरवस्था कायम असून जिल्हा प्रशासनाच्या भूमीकेबाबत शेतकऱ्यांमधून तीव्र स्वरूपाची नाराजी व्यक्त केली जात आहे, येणाऱ्या काळाला शेत रस्त्याचा प्रश्न मार्गी न लावल्यास शेतकऱ्यांकडून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे..

केंद्रीय कृषी मंत्र्यांना थेट ईमेल पाठवून सातत्याने आवाज उठवूनही अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील उरळ बु. ते लोहारा येथील शेत रस्त्यांचा प्रश्न अद्यापही रेंगाळलेलाच आहे. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा प्रशासनाने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने स्थानिक शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. काही दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत जिल्ह्यातील शेत रस्ते अडथळामुक्त करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला होता. मात्र, स्थानिक पातळीवर या आदेशाला केराची टोपली दाखवण्यात आली आहे. उरळ बु. येथील शेतकऱ्यांनी थेट केंद्रीय पातळीवर दाद मागूनही स्थानिक यंत्रणा हलण्यास तयार नाही, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. दरवर्षी पावसाळ्यात या रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण होते, ज्यामुळे ट्रॅक्टर, बैलगाड्या अडकून पडतात. कापूस, सोयाबीन आणि हरभरा यांसारख्या प्रमुख पिकांची वाहतूक करणे अशक्य होते. त्या मूळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते, जिल्हा प्रशासनाने या बाबत योग्य निर्णय न घेतल्यास ऐन पेरणीच्या वेळी शेतकरी आंदोअलं छेडतील असा इशारा देण्यात आला आहे.

# काटेपूर्णा प्रकल्पात २६.७४ टक्के जलसाठा

प्रतिनिधी २८ मे

**अकोला :** अकोला जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा पारा मोठ्या प्रमाणात वाढल्याने काटेपूर्णा प्रकल्पातील पाणी पातळी चांगलीच घसरली आहे. अकोला पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहिती नुसार काटेपूर्णा प्रकल्पात जलाशय पातळी ३४१.७९ मीटर असून त्या मध्ये उपयुक्त साठा २३.०९७ द.ल.घ.मी एव्हडा असून प्रकल्पात आजच्या घडीला २६.७४ टक्के साठा शिल्लक राहिला आहे. काटेपूर्णा प्रकल्पातील पाण्याचे बाष्पीभवन उन्हा मुळे जास्त होत असल्याने पाणी पातळी कमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. काटेपूर्णा प्रकल्पातील पाण्याचा वापर हा अकोला शहर, मूर्तिजापूर, तसेच आजूबाजूच्या ग्रामीण भागाला होतो, पावसाळ्याच्या आणखी काही दिवस विलंब असल्याने अकोला शहरातील नागिकांसमोर पाणी प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. जिल्यातील इतर प्रकल्पाची परिस्थिती सुद्धा सारखीच असल्याचे सांगण्यात येत आहे.

# पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा : जिल्हाधिकारी

प्रतिनिधी २८ मे

**अकोला :** 'गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायद्यानुसार कार्यवाहीसाठी सोनोग्राफी सेंटरच्या अचानक तपासण्या, धाडी यांची संख्या वाढवावी, तसेच 'ट्रॅकिंग सिस्टीम' राबवावी. त्याचप्रमाणे, कायद्याची व संबंधित उपक्रमांची प्रभावी जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले. जिल्हा एड्स नियंत्रण समिती, तंबाखूविरोधी अभियान, 'गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायद्यांतर्गत स्थापित समिती आदी विविध बैठका जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाल्या, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, डॉ. आशा मिरगे, मोहन खडसे, डॉ. सीमा तायडे, प्रतिभा अवचार, डॉ. विनोद करंजीकर, समितीच्या विधी समुपदेशक ॲड. शुभांगी ठाकरे, डॉ. मनीष शर्मा, जिल्हा कार्यक्रम अधिकारी दर्शन जनईकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी जिल्ह्यात करावी. बेकायदेशीर गर्भलिंग निदानाबाबत माहिती देणा-यास १ लक्ष रू. बक्षीस देण्याची तरतूद आहे. या तरतुदीबद्दल, तसेच कायद्याबद्दल प्रभावी जनजागृती करण्याचे निर्देश त्यांनी दिले. कोटपा कायद्यांतर्गत तंबाखूजन्य पदार्थ प्रतिबंधासाठी प्रत्येक शाळेत नोडल अधिकारी, तसेच कोटपा कायद्याच्या अंमलबजावणीचे अधिकार सर्व विभागप्रमुखांना देण्यात आले आहेत. जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त पोस्टर स्पर्धा, रील स्पर्धा असे उपक्रम आयोजिण्यात आले असल्याचे आरोग्य विभागातर्फे सांगण्यात आले. एचआयव्ही प्रतिबंधासाठी जिल्ह्यात ६७ तपासणी व उपचार केंद्रे आहेत. कार्यक्रमांतर्गत ४ हजार ६०० रूग्णांना औषधोपचार दिला जात आहे. जिल्ह्यात एचआयव्हीबाधितांची संख्या घटल्याचे आकडेवारीवरून दिसते. २०१५-१६ मध्ये तपासण्यांत आढळलेले बाधित ४३० होते. २०२५-२६ मध्ये तपासण्यांत १७३ बाधित आढळले. गर्भवती महिलांमधील बाधितांचे प्रमाणही घटले आहे. त्यात २०१५ मध्ये २१ बाधित होते. २०२५-२६ मध्ये हे प्रमाण ३ इतके आहे, अशी माहिती श्री. जनईकर यांनी दिली. एचआयव्ही नियंत्रण कार्यक्रमांतर्गत २१० शिबिरे घेण्यात आली व ११८ महाविद्यालयात रेड रिबन क्लब स्थापण्यात आले. सायक्लोथॉन उपक्रम घेण्यात आला. हा उपक्रम यावर्षीही घेण्याची सूचना जिल्हाधिका-यांनी केली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एआरटी (अँटी रिट्रोव्हायरल थेरपी) सेंटर राज्यात उत्कृष्ट ठरल्याबद्दल या केंद्रातील सहका-यांना जिल्हाधिका-यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

# शहराला हरित आच्छादन हाच तापमान कमी करण्याचा मार्ग

## झाडांची कटाई मोठ्या प्रमाणात परंतु वृक्ष लागवड अत्यल्प




प्रतिनिधी २८ मे

**अकोला :** जिल्ह्यातील वाढते तापमान हा चिंतेचा विषय झाला आहे. यंदाच्या उन्हाळ्यात ४६.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उन्हाळा अजूनही ग्रासतो आहे. यावर एकमेव उपाय म्हणजे या भागात हरीत आच्छादन वाढवणे. जेणेकरून उष्णता शोषून गारवा निर्माण होईल. रस्ते तयार करण्यासाठी झाडे कापली मात्र त्या प्रमाणात वृक्ष लागवड झाली नाही. आजुबाजूच्या भागात देखील पूर्वी होती तितकी झाडे राहिली नाही. वृक्ष लावा, वृक्ष जगवा ही मोहीम प्रभावीपणे राबवावी लागेल. त्या शिवाय तरणोपाय नाही अशा प्रतिक्रिया शहरातील नागरिकांनी व्यक्त केल्या.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK